# माझी अमेरिका भ्रमंती...

'परदेशवारीसाठी मनगटी बळ भरण्याचा एक छोटासा प्रयत्न'

सीए पवनकुमार झंवर



# माझी अमेरिका भ्रमंती...

‘परदेशवारीसाठी मनगटी बळ भरण्याचा एक छोटासा प्रयत्न’

सीए पवनकुमार वि. झंवर

ई साहित्य प्रतिष्ठान

# माझी अमेरिका भ्रमंती...

**‘परदेशवारीसाठी मनगटी बळ भरण्याचा एक छोटासा प्रयत्न’**

## हे पुस्तक विनामुल्य आहे
## पण फुकट नाही

या मागे कष्ट व पैसे आहेत.

म्हणून हे पुस्तक वाचल्यावर खर्च करा ३ मिनिटे

१ मिनिट: लेखकांना फोन करुन हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

२ मिनिट: ई साहित्य प्रतिष्ठानाला मेल करून पुस्तक कसे वाटले ते कळवा.

३ मिनिट: आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल आणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाद नाही मागत. मागत आहे दाद.
साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना टीका, विरोधी मयांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे, ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा., आणि संपूर्ण समाज सतत एक नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# माझी अमेरिका भ्रमंती...

## ‘परदेशवारीसाठी मनगटी बळ भरण्याचा एक छोटासा प्रयत्न’

**लेखकाचे संपूर्ण नाव:** सीए पवनकुमार विजयकुमार झंवर
**मोबाईल:** ८८०-५२०-७७७७ / ७७६-७०६-७७७७
**इमेल:** pzanvar@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अशांचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रूपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

**प्रकाशक:** ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

**प्रकाशन:** ५ मे २०१९

- विनामुल्य वितरणासाठी उपलब्ध;
- आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता;
- हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.

## लेखकाविषयी थोडेसे..



१} पवनकुमार झंवर हे **'महाराष्ट्राची दक्षिण काशी'** म्हणून ओळखल्या जाणाऱ्या **'श्रीक्षेत्र पंढरपूर'** (जिल्हा सोलापूर) येथील रहिवासी आहेत.

२} १९९९-२००० साली १२ वी वाणिज्य शाखेतून **'अकौंटन्सी'**

३} त्यांनी पुण्याच्या गरवारे महाविद्यालयातून **एम्.कॉम.**ची पदवी प्राप्त केली असून, **सीए**चा अभ्यासक्रम सन २००६ मध्ये यशस्वीरित्या पूर्ण केला आहे.
४} २००६ ते २०११ पाच वर्ष **डेलॉईट अन्ड हस्किंस** या बहुराष्ट्रीय सीए फर्ममध्ये विविध राष्ट्रीय व अंतरराष्ट्रीय कंपन्याच्या हिशोबांचा अभ्यास केला आहे.
५} जन्मभूमीच्या व माता-पिताच्या सेवेने प्रेरित होऊन गेल्या सहा वर्षांपासून त्यांनी पंढरपूरात अत्याधुनिक कार्यालयाच्या माध्यमातून **कर-सल्लागार** म्हणून सेवा देण्यास सुरुवात केली आहे. शहराच्या मध्यवर्ती परिसरात, महावीर नगर येथे त्यांचे सुसज्य असे कार्यालय आहे.
६} **'राजस्थानी मंडल, पंढरपूर**चे' अध्यक्षपद व '**रोटरी क्लब, पंढरपूर**चे**'** सचिव व उपाध्यक्षपद भूषवून त्यांनी पंढरपूरच्या समाज मनावर एक वेगळा ठसा उमटविला आहे.
७} विशेष बाब म्हणजे **समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो,** समाज सुसंकृत झाला पाहिजे या सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेऊन ते विविध समाज उपयोगी कार्यक्रमात नेहमीच सक्रीय सहभागी होतात. याच जाणीवेतून परंपरा व संस्कार विसरत चाललेल्या समाजामध्ये जागृकता निर्माण करण्यासाठी श्री झंवर यांनी महाराष्ट्रभर ३८ पेक्षा जास्त **'संस्कार मोती'** या दृकश्राव्य कार्यक्रमाचे विनामूल्य सादरीकरण केले आहे.

**त्यांच्या या प्रस्तुतीस माझ्या हार्दिक शुभेच्छा..**

**सौ. संगीता शामसुंदर जाजू**
**(अक्कलकोट)**

## अर्पण..



ज्या **"आई-वडिलांमुळे"** आपण हे अद्वितीय असे जग बघू शकलो. ज्यांच्या संस्कार व त्यागामुळे आपण समाजात आज या स्थानावर पोहचू शकलो. त्या '**आई-वडिलांना'** म्हणजेच **"श्री विजयकुमार बेगराज झंवर"** आणि **"सौ. दीपमाला विजयकुमार झंवर"** यांना मी हे माझे पहिले प्रवास वर्णनाचे पुस्तक मन:पूर्वक अर्पण करतो.

**विशेष आभार..**

माझे **आजोबा** कै. बेगराज झंवर, **आजी** श्रीमती सदाकवर झंवर, **काका** स्व. शामसुंदर झंवर, **अर्धांगिनी** सौ. स्मिता झंवर, **दोन्ही मुले** कर्तव्य आणि कुशल, **साडू** श्री तरुण सोनी, **मेहुणी** सौ. सुचिता सोनी आणि या पुस्तकाच्या पूर्णत्वासाठी मोलाचा हातभार लावणारे श्री मिलिंद तानवड़े.

**अनेक धन्यवाद..**

आपणा सर्वांच्या **शुभेच्छा** आणि **कृपार्शिवादामुळे** आज अनेक दिवसांनी पाहिलेले स्वप्न अस्तित्वात उतरत आहे. या पुस्तक लिहिण्यासाठी **प्रेरणास्थान** बनलेल्या, तसेच ज्यांच्या **मदतीशिवाय** हे पुस्तक पूर्ण होऊ शकले नसते असे काही **मित्र - परिवार, आप्तेष्ट** आणि **हितचिंतक..** ह.भ.प. श्री वा. ना. उत्पात महाराज, श्री बाळासाहेब बडवे, श्री राजेंद्र तोष्णीवाल, श्री सुरेंद्र तोष्णीवाल, श्री विष्णु झंवर, श्री नवीनचंद जाखेटे, श्री महेश भट्टड, श्री रोहित सोनी, श्री शामसुंदर जाजू, श्री श्रीकांत कलंत्री, श्री जुगलकिशोर बाहेती, श्री नंदकिशोर गो. मर्दा, श्री खर्डीकर सर, श्री कवठेकर सर, श्री चंदुलाल सुपेकर, श्री अनिरुद्ध बडवे, सीए श्री हरी लबडे, श्री राजेश हुंडेकरी, श्री रवि कोठारी, श्री सदानंद कदम, श्री देवेंद्र सांगोलकर, श्री अजित सावळे, श्री श्रीरंग बागल, श्री दामोधर मंत्री, श्री दिनेश मंत्री, श्री नरोत्तम मंत्री एवम श्रीमती मंगलताई शहा, सौ. इंदिरा मर्दा, सौ. प्रिया सोनी, सौ. प्राची भट्टड, सौ. कल्पना कलंत्री, सौ. संगीता जाजू, सीए सौ. राजलक्ष्मी शिबे आदी सर्वांचे मन:पूर्वक धन्यवाद !

**अमेरिकेत ज्या नातेवाईकांकडे थांबलो त्यांचा थोडक्यात परिचय..**

माझे साडू **श्री तरुण राजगोपालजी सोनी** हे मुळचे **हैद्राबादचे** असून ते एक **सॉफ्टवेअर इंजिनिअर** आहेत. ते गेल्या आठ वर्षांपासून अमेरिकेतील **टेक्सास** राज्यातील **ऑस्टिन** शहरात स्थायिक आहेत.

माझी मेहुणी **सौ. सुचिता तरुण सोनी** या **आर्किटेक्ट** असून त्या ही अमेरिकेत नोकरी करतात.

**प्रवास..**

**१९ में २०१७** (मुंबई-पॅरिस-अमेरिका) ते **२१ जून २०१७** (मुंबई-पॅरिस-अमेरिका) **'एअर-फ्रांस'** विमानसेवेद्वारा.

## प्रस्तावना:

महिनाभर अमेरिकेत असताना भारतात असलेल्या आपल्या मित्रांना मी अमेरिकेत भेट दिलेल्या वेगवेगळ्या **स्थळांची माहिती व फोटो सोशल मिडियावर पाठवीत होतो.** पहिल्या दोन-चार दिवसातच माझ्या त्या पाठविलेल्या माहिती व फोटोंना इतका **सुंदर प्रतिसाद मिळाला की,** त्या पुढील सर्व ठिकाणे मी जणू **त्यांच्याच डोळयांनी पाहू लागलो.**

दररोज रात्री २-३ तास बसून, दिवसभरात भेट दिलेल्या पर्यटन ठिकाणाची माहिती मोबाईलमध्ये मराठीत टाईप करायची व फोटोसह दुसऱ्या दिवशी **सकाळी ठीक ७ वाजता** सर्वांना पाठवायची याची **जवळपास सवयच लागली.** आपणा सर्वांकडून मिळालेल्या **उत्तम प्रतिसादामुळेच** मला ती सर्व माहिती या पुस्तकाच्या माध्यमातून एकत्र संकलित करण्याची **प्रेरणा** मिळाली.

जीवनाच्या या वाटेवर प्रवास करताना आपण अनेक **बऱ्यावाईट अनुभवांचे धनी** होत असतो. या अनुभवातून योग्य तो **बोध** घेऊन **पुढील वाटचाल करण्यास सज्ज होतो**. अशाच काही अनुभवांमध्ये सहभागी करून घेण्यासाठी मी अमेरिका प्रवास-वर्णन या लेखसंग्रहाद्वारे आपणासर्व रसिकांच्या भेटीला घेऊन आलो आहे.

पर्यटनाने आपणास त्या स्थळाचे **सांस्कृतिक, वैज्ञानिक, आध्यात्मिक ज्ञान** मिळते. म्हणूनच **अमेरिकेसारख्या** देशांविषयी आपल्या ज्ञानात भर घालण्यासाठी आणि परदेशवारी पूर्वी कोणती तयारी करावी, पासपोर्ट / व्हिसा कसा काढावा, त्या देशात जाताना कोणती काळजी घ्यावी, कोणत्या ठिकाणी कोणत्या वेळेत फिरावे आदी सर्व प्रश्नांची उत्तरे या पुस्तकातून **आपल्यापर्यंत पोहचवण्याचा** एक प्रयत्न करीत आहे.

**सीए पवनकुमार विजयकुमार झंवर**

# अनुक्रमणिका:



| अनु. | तपशील |
|---|---|
| 1. | **पासपोर्ट कसा काढावा?** |
| 2. | अमेरिकेसाठी व्हिसा कसा काढावा? |
| 3. | परदेशी जाताना घ्यावयाची काळजी व कांही महत्वाच्या सूचना |
| 4. | **अमेरिकेतील राहणीमान** |
| 5. | अमेरिकेतील वाहतुक व्यवस्था |
| 6. | वॉशिंग्टन - डि.सी. (राजधानीचे शहर) |
| 7. | **न्यूयॉर्क - टाईम्स् स्क्वेअर** |
| 8. | न्यूयॉर्क - स्टॅच्यू ऑफ लिबर्टी |
| 9. | न्यूयॉर्क - ऐंपायर स्टेट |
| 10. | **अमेरिकेतील भारतीय हॉटेल्सची लज्जत भारीच..** |
| 11. | ड़ोळ्याचे पारणे फेडणारा - नायगारा धबधबा |
| 12. | पेज - ॲन्टेलोप कॅनिअन आणि हॉर्स-शू-बेंड़ |
| 13. | **लास वेगास - वाळवंटातील हिरवळ** |
| 14. | लास वेगासचे पहिले वैशिष्ट्य |

| | |
|---|---|
| 15. | लास वेगासचं दुसरे वैशिष्ट्य |
| 16. | **ओरलँडो: 'पूर्वेचे हॉलिवूड'** |
| 17. | ओरलँडो: 'थीम पार्कची राजधानी' |
| 18. | सॅन एंटोनियो: सी-वर्ल्ड पार्क |
| 19. | **सॅन एंटोनियो: हॉटेल फेअरमाऊंट** |
| 20. | सॅन एंटोनियो: हॉटेल हिल्टन पॅलासिओ डेल रिओ |
| 21. | सॅन एंटोनियो: नैसर्गिक गुहेतील नैसर्गिक पूल |
| 22. | **पिट्सबर्ग - आइका फर्निचर मॉल** |
| 23. | ऑस्टिन - थिंकरी पार्क |
| 24. | पाहुणचार कसा करावा? |
| 25. | **अमेरिकेतून भारतात आल्यावर मिळालेले सुखद धक्के..** |
| 26. | राष्ट्रप्रेम कसे असावे? |
| 27. | अभिप्राय |

# १. पासपोर्ट कसा काढावा?

**फिरण्याची आवड** असल्यास किंवा **कामानिमित्त परदेशी** जावे लागल्यास **पारपत्र** म्हणजेच **पासपोर्ट** काढणे गरजेचे आहे. पण पारपत्र काढण्यासाठी **पासपोर्ट कार्यालयात** सारखे खेटे मारावे लागतात, असा काही जणांचा समज आहे मात्र तो समज चुकीचा आहे. आज **पासपोर्ट** काढायची सर्व प्रक्रिया ही ऑनलाइन झाली असून आपणा सर्वांच्या माहितीसाठी ती येथे देत आहे.

- प्रथम तुम्हाला http://passportindia.gov.in/AppOnlineProject/online/procEFormSub या संकेतस्थळावर जावे लागेल. तेथे प्रथम विचारलेली सर्व **माहिती भरून रजिस्टर** करावे लागेल.
- त्यानंतर तुमचा **लॉग-इन आयडी** तयार करून नवीन पासपोर्ट काढण्यासाठीच्या लिंकवर **(Apply for New Passport)** क्लिक करा. जर तुम्ही पूर्वी पासपोर्ट काढला असेल तर व तो एक्सपायर झाला असल्यास **(Reissue of Passport)** या लिंकवर क्लिक करा.
- दिलेल्या अर्जामध्ये आपली आवश्यक ती असेली माहिती भरा आणि अर्ज **'सबमिट'** करा.
- त्यानंतर **पे अ‍ॅण्ड शेडय़ूल अपॉइंटमेंटवर** क्लिक करा. पासपोर्ट काढण्यासाठी **ऑनलाइन पेमेंट** सेवा **अनिवार्य** केली आहे.
- तुम्ही क्रेडिट कार्ड / डेबिट कार्ड किंवा इंटरनेट बँकिंग द्वारे पेमेंट करू शकता.
- **प्रिंट अ‍ॅप्लिकेशन रिसिप्ट** या लिंकवर क्लिक करा. त्यानंतर **अ‍ॅप्लिकेशन रेफरन्स क्रमांक** असलेली पावती छापून येईल.
- वर नमूद केलेली पावती  व खाली नमूद केलेल्या आवश्यक कागदपत्रांसह तुम्ही पासपोर्ट कार्यालयाला ठरलेल्या दिवशी आणि वेळी भेटू शकता.

**पासपोर्ट मिळण्यासाठी आवश्यक कागदपत्रांच्या मुळ प्रति –**

**१} फोटो आयडेंटिटी:** आधार कार्ड / निवडणूक कार्ड / ड्रायव्हिंग लायसन्स

**२} जन्मतारखेचा पुरावा:** जन्म दाखला / शाळा सोडल्याचा दाखला

**३} लग्न झाले असल्यास:** महिलांच्या बाबतीत मॅरेज सर्टिफिकेट / प्रतिज्ञापत्र (नमूना संकेतस्थळावर उपलब्ध आहे)

**४} जर लग्नात नाव बदलले असल्यास:** प्रतिज्ञापत्र (नमूना संकेतस्थळावर उपलब्ध आहे)

☆☆☆

## २. अमेरिकेसाठी व्हिसा कसा काढावा?

२१व्या शतकात, शहरांमध्ये राहणाऱ्या प्रत्येकाचा कोणी ना कोणी पाहुणा परदेशात राहातच असतो. माझेही कोणीतरी म्हणजेच.. **मेहुणी आणि साडू** गेली पाच-सात वर्षांपासून राहत आहेत. गेल्या दोन वर्षांपासून दोघेही आम्हा चौघांना अमेरिकेस येण्यासाठी आग्रह करीत होते. चालू वर्षात तर बायकोनं, **तुम्ही आला नाहीत.. तर मी आणि दोन्ही मुलं जाऊन येतो अमेरिकेला अशी तंबीच दिली**..!!

१} **आता नवीन मोहिम..** म्हणजे **पासपोर्ट, व्हिसा.. सार सार करणं आलं.** जायचय ठरवल्यावर अनेक जवळच्या वाटणाऱ्याशी चर्चा सुरु केली. प्रत्येकाचा सल्ला निराळाच. माझ्या एका मित्राच्या आई-वडिलांचा तर तीन वेळा अमेरिकेचा व्हिसा नाकारण्यात आला. त्यामुळे व्हिसा मिळवण हे मला स्वप्न वाटू लागले.

२} सोप्या भाषेत सांगावयाचे झाल्यास **'व्हिसा'** म्हणजे दुस-या देशात प्रवेश करण्यासाठी मिळवलेली परवानगी होय. **व्हिसा परवानगीचे एक स्टीकर** व्हिसा मिळाल्यावर, आपल्या **पासपोर्ट वर चिटकवून देतात**. सर्वसाधारण सर्व देशांच्या पद्धती सारख्याच असतात, प्रत्येक देशांची वेबसाईट असते, त्यावर त्या देशासाठी लागणा-या व्हिजाची पूर्ण माहिती मिळते. अमेरिकेचा एकदा मिळालेल्या व्हिसाची मुदत ही **१० वर्षे** असते. त्यामुळे एकदा व्हिजा मिळाल्यावर पुन्हा १० वर्षांपर्यंत अमेरिका भेटीसाठी आपल्याला पुन्हा-पुन्हा व्हिसा घेण्याची आवश्यकता अजिबात नाही.

३} **कॉम्प्युटरवर अमेरिकन व्हिसाची साईट ओपन केली** व सर्व माहितीचे प्रिंटआऊट घेतले. एक एक पान वाचून **मती गुंगच झाली.** जाणार कोठे? कोणाकडे? आपण तेथे का जात आहोत? किती दिवसांसाठी जात आहोत? इत्यादी सर्व माहिती, तसेच कागदपत्रे म्हटल्यास मागील ३ वर्षांचे आय.टी, आर, पगाराच्या पावत्या, सरकारी नोकरीत असल्यास त्यांचे ना हरकत पत्र (NOC) लागते, ६ महिन्यांचे बँक पासबुक, बँके मध्ये ठेवलेल्या ठेव पावत्या, तुमच्या नावावर भारतात असण्या-या स्थावर मालमत्तेची कागदपत्रे **अशी न संपणारी कागदांची जंत्री** हा व्हिसा

मिळविण्यासाठी लागते हे सारे वाचल्यावर **मला उगाचच पोलिस स्टेशनवर वा कोर्टात जामीन देणा-या माणसाची आठवण** झाली.

**व्हिसासाठी DS-१६० हा फॉर्म भरणे अनिवार्य आहे**, जो आपल्याला
https://ceac.state.gov/ceac/

या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. त्यानंतर आपल्याला **व्हिसासाठी Appointment**
http://www.ustraveldocs.com/in/in-niv-visaapply.asp या संकेत स्थळावर भेट देऊन घेता येते. त्यांच्या वेबसाईट वरच **मुलाखतीची तारीख** मिळते. त्यात वेळ सुद्धा असते. जमल्यास सर्व नियमांची प्रिंटआऊट काढून जवळ ठेवावी.

४} व्हिसाची फी ही ऑनलाइन किंवा बँकेत चलन भरुन जमा करू शकतो दोन्ही प्रकारे कोणत्याही प्रकारे पेमेंट केलेल्या पावत्या नीट जपून ठेवाव्यात. मी २०१७ मध्ये जेव्हा व्हिजा साठी अर्ज केला तेव्हा फी ही रुपये १४,०००/- प्रति व्हिजा प्रति व्यक्ति होती. जर व्हिजा नाकारण्यात आल्यास सदर फी चा कोणताही परतावा मिळत नाही.

५} **सर्व कागदपत्रांची फाईल बनवावी.** त्यात क्रमाने कागदपत्रे लावावीत. इंटरनेटवरून मिळालेल्या अर्जांची प्रिंटआऊट Appointment Letter, पासपोर्ट व वर नमूद केलेली कागद पत्रे त्यात ठेवावीत. मुंबईला निवडलेल्या वेळेआधी एक तासतरी पोहोचावे.

६} सदर ची **व्हिजा प्रणाली** ही **दोन दिवसांची** असून **पहिल्या दिवशी** आपले हातांचे ठसे व फोटो घेतले जातात व **दुस-या दिवशी** आपला इंटरव्यूह घेतला जातो. ही दोन्ही ठिकाणे वेगवेगळया ठिकाणी असून यामधील अंतर जवळपास १.२५ किलोमीटर आहे.

७} **पहिल्या दिवशी** दोन्ही हातांच्या तर्जनीच्या (अंगठ्याजवळील बोटे) बोटांचे ठसे (फिंगर प्रिंट) घेतात. जर **बोटाला काही जखम झाली असल्यास घरी परत पाठवतात**, म्हणून बोटे फार सांभाळावी. विशेष म्हणजे अमेरिकेत जाऊन आपले काम झाल्यानंतर पुन्हा भारतात

परतताना अमेरिकन विमानतळावर आस्थलांतरणाच्या (Immigration) वेळेस पुन्हा ठसे पाहतात, **म्हणून मधल्या काळात बोटे फार सांभाळावी लागतात.**

८} **दुस-या दिवशी** इंटरव्यूहसाठीच्या कार्यालयात मोबाईल फोन, धारदार वस्तू, खाण्यापिण्याचे सामान नेण्यास मनाई आहे आणि **तिथे ते ठेवण्याची सोय नसते** अन्यथा ते फेकून द्यावे लागते, तेव्हा बरोबर काही नेऊ नये. **आत गेल्यावर परत बाहेर कोणत्याही कारणास्तव सोडत नाहीत.** तेव्हा सगळी कागदपत्रे बरोबर न्यावीत. रक्तदाब (Blood Pressure), मधुमेह(Diabetes), दमा (Asthma), वगैरे त्रास असल्यास गोळया बरोबर ठेवाव्यात. एवढे होऊनही काही अडचण आल्यास तेथील माणसाला न लाजता सांगावे, ते मदत करतात.

९} आत गेल्यावर भाषा विचारतात तेव्हा आपल्याला समजेल ती भाषा (हिंदी / मराठी) सांगावी, त्या भाषेचा दुभाषी देतात. इंग्रजी येण्याची अजिबात आवश्यकता नाही. कारण आपल्या भाषेत आपण उत्तरे बरोबर देऊ शकतो. आपल्या भाषेतीलच दुभाषी घ्यावा. उत्तरे देताना गडबड झाल्यास व्हिसा नाकारला जातो. आत नंबरप्रमाणे बोलावतात त्यामुळे, गडबड करू नये. **चार-पाच तास थांबण्याची** तयारी करून जावे. आत मुलाखत देताना **जेवढे विचारतील** तेवढ्याच प्रश्नांची थोडक्यात उत्तरे द्यावीत, अजिबात जास्त, अवास्तव बोलू नये. अनावश्यक माहिती देऊ नये. विचारतील तेवढीच कागदपत्रे दाखवावीत, म्हणून कागदपत्रे फाईलमध्ये नीट लावून घ्यावीत. तेथे शोधत बसू नये. **न विचारलेली कागदपत्रे दाखवू नयेत.**

१०} मुलाखत झाल्यावर **व्हिसा मिळाला असल्यास लगेच सांगतात**, मग चार-पाच दिवसात व्हिसा परवानगी असलेले पासपोर्ट पुण्यात येतात, तेथून आपल्याला ते ओळख दाखवून घ्यावे लागते. जर व्हिसा नाकारल्यास तेथेच पासपोर्ट परत देतात.

११} चार–पाच दिवसांनंतर आपण पासपोर्ट व्हिजा परवानगीसह **मुंबई किंवा पुणे ऑफिस** मधून पावती दाखवून आपल्या ताब्यात घेऊ शकता. या साठी आपण समक्ष किंवा आपला प्रतिनिधी एक **Authority Letter** देऊन पाठवू शकता. सदर **ऑफिसचा पत्ता** व **Authority Letter** पत्राचा नमूना संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

व्हिसा आल्यावर **नीट तपासून पहावा.** चूक असल्यास स्थानिक कार्यालयात लगेच **तक्रार करावी,** नाहीतर परदेशात काय त्रास होईल, याची आपण कल्पना करू शकत नाही.

☆☆☆

# ३. परदेशी जाताना घ्यावयाची काळजी व कांही महत्वाच्या सूचना

१. पासपोर्ट सांभाळावा.

२. विमान तिकीट सांभाळावे.

३. सोबतच्या माणसापासून / लहान मुलांपासून दूर जाऊ नये.

४. सरकारी अधिकाऱ्याशिवाय इतरांना पासपोर्ट दाखवू नये.

५. शक्यतो कोणालाही आपला पत्ता देऊ नये.

६. फक्त अधिकृत माणसाकडेच चौकशी करावी, त्यांना अडचण सांगावी.

७. अनोळखी व्यक्तिच्या सामानास अजिबात हात लाऊ नये.

८. शक्यतो इंटरनॅशनल रोमिंगचे कार्ड घालून मोबाईल फोन जवळ ठेवावा / फ्री वाय-फाय चा वापर करावा.

९. आपली कागदपत्रे कोणालाही दाखवू नयेत.

१०.विमानतळावर अधिकृत टॅक्सी बुक करता येते तेथूनच टॅक्सी ठरवावी.

११. आपली रोजची औषधे सोबत ठेवावीत.

१२.परदेशात आपण कोठे जाणार आहोत, तेथील पत्ता विचारतो, व्यक्तीचे नाव, मोबाईल नंबर एका कागदावर लिहून जवळ ठेवावा.



# ४. अमेरिकेतील राहणीमान

अमेरिकेत आम्ही सर्वजण माझे साडू श्री तरुण यांच्याच घरी वास्तव्यास होतो. ते **टेक्सास** राज्याच्या **ऑस्टिन** या शहराचा **मध्यवर्ती** आणि **नदी किनारी** असलेल्या म्हणजेच **कोल अपार्टमेंट, ऑस्टिन** येथे राहतात.

१} अमेरिकेतील प्रत्येक शहर हे सहसा **निसर्गनिर्मित नदी** वर वसविण्यात आले आहे अथवा शहरातून **मानवनिर्मित नदी** वळविण्यात आली आहे. आणि या नदीच्या दोन्ही किना-यावर **हिरवी झाडी उभारून** तो परिसर पादचा-यांकरीता व सायकल चालविण्या-यांकरीता राखीव ठेवण्यात आला आहे.

२} भारतात असताना रोज सकाळी लवकर उठून योगासने व प्राणायाम करण्याची सवय असल्याने, अमेरिकेत गेल्यावर ही मी सकाळी लवकर उठून फेरफटक्याकरीता या शहरातील नदी किनारी फिरण्यास सुरुवात केली. येथे सकाळी फिरायला येणारे अन्य नागरिक सहसा आपल्याकड़े पाहून **स्मितहास्य** देताना दिसतात, **सु-प्रभात** म्हणजेच **Good Morning** म्हणताना दिसली. भारतात सहसा आपल्याला असे चित्र दिसत नाही.

३} व्यवसायाने **सीए असल्याने** प्रत्येक गोष्ट **नीट न्याहाळण्याची** जवळजवळ सवयच झाली आहे. सकाळच्या फेरफटक्याला जाताना तेथील रस्ते, बांधलेली घरे, वाहतुकीचे सिग्नल यांचे बारकाईने निरिक्षण करण्यात **एक वेगळीच मजा येत होती.**

४} सहसा येथील सर्व इमारती / घरे यांचा पाया व बाहेरील भिंती या पारंपरिक पद्धतीने म्हणजेच स्टील, विटा, सिमेंट आणि वाळू आदींनी बनवलेल्या आहेत. आतील सर्व भिंती या लाकडाच्याच असतात. परंतु या लाकडाच्या भिंतीचे **फिनिशिंग इतक्या सुबक व सुंदर पद्धतीने करण्यात येते,** की जोपर्यंत आपण या अंतर्गत भितींवर **टिचकी मारत नाही** तोपर्यंत आपल्याला लक्षातच येत नाही की, **या भिंती लाकडाच्या आहेत.**

५} अमेरिकेत **स्वत:ने स्वतःचे घर** बांधणे हे **फार खर्चिक काम** आहे. सामान्यतः इथे मोठमोठ्या बांधकाम करणा-या कंपन्या या एक भला मोठा भूखंड घेऊन त्याठिकाणी वेगवेगळया पद्धतीची घरे, रो-हाऊस, फ्लैट्स असे बांधून देतात. माझे साडू अश्याच **'कोल अपार्टमेंट'** मध्ये भाड्याने राहत आहेत. त्यांच्याकडून अशी माहिती मिळाली की अमेरिकेत जर तुम्ही भाड्याच्या घरात रहात असाल तर **तुमच्या कडून 'फक्त घरभाडे' आकारले जाते.** या घरभाड्यात इतर खर्च जसे की प्लंबिंग दुरुस्ती, लाईट फिटिंग दुरुस्ती किंवा इतर संबंधित वस्तू दुरुस्ती यासारख्या सर्व खर्चांचा समावेश असतो.. त्यामुळे अश्या अन्य कामांसाठी आपणांस **वेगळा कोणताही अतिरिक्त खर्च करण्याची आवश्यकता नाही. पण हे घरभाडे सर्व खर्च समाविष्ट असल्याने नक्कीच गलेलठठ असावे यात नक्कीच शंका नाही. ;)**

६} अमेरिकेत घर किंवा अन्य कामांसाठी **मजुर मिळणे ही फार महागडी गोष्ट** आहे. त्यामुळे तिकडे आपल्याला भारतासारखे घरकामासाठी कामगार किंवा मोलकरणी मिळत नाहीत. महागड्या मजुरांमुळे **तुम्हाला स्वतःलाच आपापली रोजची कामे करणे** आवश्यक आहे म्हणूनच बहुतेक घरांमध्ये वॉशिंग-मशिन, डिशवॉशर, व्हॅक्यूम क्लिनर इ. असतात. पेट्रोल पंपावर देखिल आपल्याला आपल्या गाडीत स्वतःलाच पेट्रोल भरावे लागते.

७} भारतासारखे इथे कोणत्याही अपार्टमेंटमध्ये पहारेकरी / व्हाचमन दिसत नाहीत. त्याऐवजी सर्व ठिकाणचा प्रवेश हा आपल्याला **'डिजीटल ऍक्सेस'** बटन दाबुनच करावा लागतो. नविन ठिकाणी किंवा मित्राच्या अथवा नातेवाईकाच्या घरी जाण्यासाठी त्याच्या अपार्टमेंटच्या प्रवेशद्वारातून डिजीटल ऍक्सेसद्वारा त्याच्या मोबाईलवर **प्रवेशाची पुष्टी करण्याची आवश्यकता** आहे, त्याने ती दिल्यावरच आपल्याला त्या अपार्टमेंट मध्ये प्रवेश मिळतो. सहसा येथील घराच्या दरवाजावर **डोअरबेल दिसून आली नाही.** एकंदरीत अगदी लहान-सहान गोष्टीही येथे डीजीटल असल्याचे दिसते.

८} बहुतेक अपार्टमेंटच्या प्रत्येक मजल्यावर पार्किंगसाठी जवळपास **एक तृतीयांश जागा** देतात. **अपंगांना सोडून** एकही राखीव पार्किंग दिसले नाही, अपार्टमेंटमध्ये राहणारे रहिवाशी

कोणत्याही पार्किंग जागेवर आपली गाडी पार्क करू शकतात. जर तरी आपल्यास **राखीव पार्किंग** पाहिजे असल्यास **मोठी किंमत मोजुन** आपण ते खरेदी करू शकतो.

१०} वीज किंवा पाणी समस्या नसल्याने सर्व ठिकाणी **शून्य लोड-शेडिंग** आणि **२४ तास अखंडित** पिण्याचा व इतर वापराच्या **पाण्याचा पुरवठा** दिसून आला.

११} **भारत** आणि **अमेरिका** या दोन्ही देशातील **मोजमापाचे परिमाण व इतर गोष्टींमध्ये** मला खालीलप्रमाणे प्राकर्षाने **बदल** जाणवून आले;

| **भारत** | **अमेरिका** |
|---|---|
| किलोमीटर | मैल |
| लिटर | गॅलन्स |
| चौरस फूट | क्युब मीटर |
| किलोग्रॅम | पाउंड |
| अंश सेल्सियस | फेरेनाईट |
| उजव्या बाजूला स्टेअरिंग असलेल्या गाड्या | डाव्या बाजूला स्टेअरिंग असलेल्या गाड्या |
| रस्त्यावरून डाव्या हाताने चालणे | रस्त्यावरून उजव्या हाताने चालणे |
| संपूर्ण देशासाठी<br>एकच ध्वज | देशासाठी एक व<br>प्रत्येक राज्यासाठी वेगवेगळा ध्वज |

# ५. अमेरिकेतील वाहतुक व्यवस्था..

अमेरिकेत वाहतुकीच्या नियमाचे फार **काटेकोरपणे पालन** होताना दिसून आले. या ठिकाणी **हॉर्न वाजविणे** हे कटाक्षाने **टाळले** जाते, सांगायला खरंच **नवल वाटतं** की पूर्ण महिन्याभराच्या या कालखंडात अमेरिकेत आम्ही मोजून फक्त **३ वेळाच** हॉर्नचा आवाज ऐकला.

१} येथे चारचाकी गाडी वापरण्याचे प्रमाण फार जास्त आहे, दोन चाकी वाहन वापरण्याचे प्रमाण फारच कमी आहे. येथे फक्त **शौकीन लोकं** दुचाकी घेतात आणि सांगायला विषेश वाटतं की दुचाकींची किंमतही ही देखील चार चाकी वाहनापेक्षा कमी नसते. रात्रीच्या वेळी **मस्तपैकी लांबचा सैर सपाटा** मारण्यासाठी येथील लोकं **'हार्डले-डेव्हिडसन'** सारख्या महागड्या दुचाकी वापरतात.

२} येथे चारचाकी वाहन चालवीत असताना **आपल्याला समोरच्या गाडीचे चाक**, हे आपल्या गाडीतून **दिसावे** असा नियम आहे असे समजले. समोरचे चाक दिसण्यासाठी या दोन गाड्यातील अंतर **कमीतकमी सहा ते आठ फूट** असणे अपेक्षित असते. आपल्याकड़े या अंतरामध्ये एक चारचाकी व दोन-तीन दुचाकी किंवा एखादी रिक्षा तर नक्कीच आढळून येईल. पण अमेरिकेत मात्र या नियमाचे आम्हाला न्यूयॉर्क सारख्या गर्दीच्या शहरात, **एक किलोमीटरचे ट्रॅफिक जॅम असतानाही** प्रकर्षाने **पालन** केल्याचे निदर्शनास आले.

३} येथील चारचाकी गाड्या देखील **फार ऍडव्हान्स** स्वरूपातील असतात. गाड्यातील सर्व महत्वाची बाब म्हणजे आपल्याला गाडीच्या ड्रायव्हर समोर असलेल्या **संकेतस्थळावर बघण्याची** व्यवस्था असते. म्हणजेच **कोणत्या टायरमध्ये किती हवा आहे?** हे देखील आपण ड्राईव्हर सीटवर बसूनच चेक करू शकतो. येथील सर्व गाड्यांमधील **गिअर व्यवस्था** ही **ऑटोमॅटिक** पद्धतीचीच दिसून आली. तसेच कोणत्याही गाडीत क्लच नसल्याने गाडी ही फ़क्त एक्सेलेटर व ब्रेक या दोन्हींवरच नियंत्रित करता येते. त्यामुळे येथील वाहन चालवताना फक्त एकाच पायाचा वापर करावा लागतो.

४} आम्ही ज्या भागात राहिलो तो भाग म्हणजे **टेक्सास राज्यातील ऑस्टिन शहर**, जे **'ऑटो-हब'**

म्हणून पूर्ण अमेरिकेत प्रसिद्ध आहे. या ठिकाणी  लहान-मोठ्या, स्वस्त-महागड्या, दोन-सीटर ते आठ-सीटर अश्या सर्व **एक-से-बढकर-एक** गाड्या आम्हाला पहावयास मिळाल्या. विशेष बाब म्हणजे, येथील सर्व वाहनात **डाव्या बाजूस स्टीअरिंग** असून अमेरिकेत ही सर्व वाहने आपल्याला **रस्त्याच्या उजव्या बाजूने** चालवावी लागतात. ही गोष्ट **भारतात अगदी विरुद्ध** आहे. एका स्टेडियमच्या भल्यामोठ्या व पूर्णपणे रिकाम्या असलेल्या पार्किंग लॉटमध्ये १५ मिनिटे अमेरिकेन गाडी चालविण्याचा **आनंदही** माझ्या साडूंनी मला उपलब्ध करून दिला.

☆☆☆

# ६. वॉशिंग्टन - डि.सी. (राजधानीचे शहर)

१} वास्तविक 'अमेरिका' हे एका भूभागाला दिलेले नाव आहे. अमेरिका हे उत्तर, मध्य आणि दक्षिण अशा ३ भागात विभागलेले असून त्यात कॅनडा, मेक्सिको, पनामा आणि ब्राझीलसह अनेक देशांचा समावेश होतो. **संयुक्त राज्य अमेरिका (United States Of America)** हा या देशांपैकी एक आहे. अनेकदा आपण **अमेरिका** (America) आणि **संयुक्त राज्य अमेरिका** (United States Of America) या दोहोंना एकच समजतो.

२} **वॉशिंग्टन, डि.सी.** मधील **डि.सी.** चा अर्थ **डिस्ट्रिक्ट ऑफ कोलंबिया** (DC=District of Columbia) असा आहे. त्यावेळी अमेरिकेचे प्रचलित नाव **'कोलंबिया'** असे होते. पहिले राष्ट्राध्यक्ष जॉर्ज वॉशिंग्टन यांच्या नावावरून या शहराला **'वॉशिंग्टन'** हे नाव देण्यात आले आहे. तेव्हापासून या शहराला **वॉशिंग्टन - डिस्ट्रिक्ट ऑफ कोलंबिया** म्हणजेच **वॉशिंग्टन डि.सी.** असे संबोधण्यात येवू लागले. हे ठिकाण न्यूयॉर्कपासून जवळपास ३५० कि.मी. दूर आहे.

३} वॉशिंग्टन, डि.सी. ची स्थापना **१६ जुलै १७९०** रोजी संयुक्त राज्य अमेरिका या राष्ट्राची **राजधानी** म्हणून झाली. त्या पूर्वी **न्यूयॉर्क** आणि **फिलाडेल्फिया** या शहरांना राजधानी होण्याचे गौरव प्राप्त झाले होते.

४} आपल्याकडील **नवी दिल्ली** आणि **चंडीगढ** यांच्या सारखा **वॉशिंग्टन डि.सी.** हा देखील **एक केंद्रशासित प्रदेश** आहे. अमेरिकेत ५० राज्य आहेत परंतु बऱ्याच वेळा ती ५२ आहेत असा उल्लेख अनेक ठिकाणी करण्यात येतो. कारण **वॉशिंग्टन, डि.सी.** आणि **पोर्टो रिको** या दोन केंद्रशासित प्रदेशांचा समावेश राज्यात करण्यात येतो.

५} मेरीलँड व व्हर्जिनिया राज्यांच्या मधे पोटॉमॅक नदीच्या **काठावरील** एका जमिनीच्या तुकड्यावर **वॉशिंग्टन, डि.सी.** शहर वसवले गेले. या शहराचे क्षेत्रफळ सुमारे **177 वर्ग किलोमीटर** आहे. **२०११ साली ६.१८ लाख लोकसंख्या** असलेले वॉशिंग्टन हे अमेरिकेमधील **२४व्या क्रमांकाचे** मोठे शहर आहे.

६} या ठिकाणचे तापमान साधारण उष्ण असते व थंडीच्या दिवसात (हिवाळयात) येथे बर्फही पडतो. या शहरास भेट देण्याचा उत्तम कालावधी में ते सप्टेंबर असा आहे. वॉशिंग्टनला **१९९०** पर्यंत **'मर्डर कॅपिटल'** म्हणून ओळखले जायचे, परंतु आता येथील गुन्हेगारी फारच कमी झाली आहे. **अमेरिकेतील** अन्य शहरांसारखे येथेही **भरपूर भारतीय लोक** वसलेले आहेत.

७} अमेरिकन सरकारच्या तीनही प्रशासकीय शाखा **संसद, जगातील सर्वात प्रभावी राष्ट्राध्यक्षांचे घर** (White House) व **न्यायालय** वॉशिंग्टन शहरातच स्थित आहेत. या शहराच्या **१/५ भागात उद्यान क्षेत्र** आहे. तसेच येथे जगातील १७६ देशांचे दूतावास, जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व इतर अनेक जागतिक संस्थांची मुख्यालये स्थित आहेत.

८} या शहरात व्हाईट हाऊस, नॅशनल झू-लॉजिकल पार्क, नॅशनल मॉल, वॉशिंग्टन स्मारक (Washington Monument), लिंकन मेमॉरियल, राष्ट्रीय वायु आणि अंतरिक्ष संग्रहालय (National Air and Space Museum) आदी जवळपास ३०-४० **ऐतिहासिक व पाहण्यासारखी ठिकाणे** आणि **वास्तू** आहेत. त्यापैकी महत्वाची स्थळे पुढीलप्रमाणे;

- ✓ **व्हाईट हाउस:** हे अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांचे अधिकृत निवासस्थान व कार्यालय असून ही इमारत अतिशय सुंदर व पांढऱ्याशुभ्र अश्या दगडांनी बांधलेली आहे. येथे ३ महिने अगोदर अर्ज करून संपूर्ण व्हाईट हाउस आतुन पाहता येतो.
- ✓ **कॅपिटल विभाग:** अमेरिकेतील सिनेटचे सभागृह व राजधानीतील सर्वात जुनी पण वास्तूशास्त्राचे उत्तम उदाहरण असलेली भव्य इमारत. येथेही पास घेऊन मोफत भटकंती करता येते.
- ✓ **वॉशिंग्टन स्मारक (Washington Monument):** हे जगातील सर्वात उंच दगडी स्मारक असून, याची उंची ५५५ फूट एवढी आहे. जॉर्ज वॉशिंग्टन यांच्या स्मरणार्थ यांची निर्मिती १८८८ मध्ये करण्यात आली. तिकीट घेऊन हे स्मारक देखील आपण आतुन वरपर्यंत पाहू शकतो.

- ✓ **राष्ट्रीय वायु आणि अंतरिक्ष संग्रहालय (National Air and Space Museum):** या ठिकाणी जवळपास ६० अंतराळात प्रवास केलेली विमाने, चांद्रयान, अंतराळवीरांचा पोशाख आदी अनेक गोष्टी पाहावयास मिळतात. सन १९०३ मधील राईट बंधूचे विमानही या ठिकाणी जतन करून ठेवले आहे. अमेरिकेच्या अंतराळ मोहिमेचा संपूर्ण इतिहास चित्रफितीच्या माध्यमातून येथे पर्यटकांना दाखविण्यात येतो. अंतराळ मोहिमांचा इतिहास येथे जपण्याचा अमेरिकेने सुंदर प्रयत्न केला आहे.
- ✓ **आंतरराष्ट्रीय स्पाय म्युझिअम:** येथे गुप्तहेरासंबधी ६०० हून अधिक उपकरणे असून, २००२ मध्ये पर्यटकांसाठी सुरु करण्यात आलेले असे हे जगातील ‘एकमेव म्युझिअम’ आहे.
- ✓ **जॉन एफ. केनेडी सेंटर:** हे मोठे आर्ट सेंटर असून यात ३ मोठे थिएटर्स व ५ लहान विभाग आहेत. येथील येथील कॉन्सर्ट हॉल मध्ये २४०० लोकांची बैठक व्यवस्था आहे.

या पैकी पहिल्या ४ स्थळांना आम्हाला भेट देण्याचा योग आला.

**वॉशिंग्टन डि.सी. हे ठिकाण ३-४ दिवसांची सवड काढून बघितल्यास येथे आपल्याला अमेरिकेतील संस्कृतीचे उत्तम दर्शन घडून येते.**

☆☆☆

## ७. न्यूयॉर्क - टाईम्स् स्क्वेअर..

अमेरिकेतील **न्यूयॉर्क** शहरातील मध्यवर्ती बाजारपेठेचे एक महत्वाचे व जगप्रसिद्ध ठिकाण म्हणजेच... **टाईम्स् स्क्वेअर.** मागील वर्षात याच ठिकाणी आपले पंतप्रधान श्री नरेंद्रजी मोदी यांनी अमेरिकेत स्थायिक भारतीयांना संबोधित केले होते.

१] हे ठिकाण सकाळ पेक्षा रात्री भटकंती करण्याजोगे आहे. **पहाटे २ पर्यंत** ही बाजारपेठ खुली असते.

२] या ठिकाणी संपूर्ण बाजारपेठेत **मोठमोठे डिजिटल फलक** लावण्यात आले आहेत.

३] हे डिजिटल फलक आणि त्यावरील कलात्मक जाहिराती बघून **खरोखरीच ड़ोळे दिपून गेल्याशिवाय** राहत नाही.

४] अमेरिकेत आल्यावर **आवर्जून बघण्याचे ठिकाण..**

अमेरिकेच्या भाषेत सांगायचे झाले तर.. **एकदम HaPPeNiNg pLaCe,**

मराठमोळ्या भाषेत सांगायचे झाले तर.. **लय लय भारी मजा**

या बाजारात तुम्हाला जगभरातील अनेक वस्तु पाहता येतील आणि खरेदीही करता येतील. मला तर हे मार्केट जाम आवडले. ज्याप्रमाणे **महाराष्ट्रात मुंबई** फेमस आहे, त्या प्रमाणे **न्यूयॉर्क मध्ये टाईम्स् स्क्वेअर** ही प्रसिद्ध बाजारपेठ आहे. संध्याकाळच्या वेळेस तर ही बाजारपेठ अगदी **हाऊसफुल्ल** असते. जगभरातील अनेक पर्यटक, स्थानिक नागरिक येथे खरेदीसाठी येतात. त्यामुळे संध्याकाळी या बाजारपेठेत लाखोंची उलाढाल होते. **कलाकुसरीच्या** तसेच **जीवनोपयोगी** अश्या अनेक वस्तुंनी ही बाजारपेठ फुललेली असते.

विशेष बाब म्हणजे या बाजारपेठेच्या मधोमध **एक भला मोठा चबुतरा** बनविण्यात आला आहे. पर्यटक येथे येऊन **मनसोक्त आपले फोटो काढून सदैव आनंद देतील** अश्या **आठवणी** येथून घेऊन जातात.

चकाचक रस्ते, **विलोभनीय रोषणाई** असलेल्या या बाजारपेठेमुळे न्यूयॉर्कला एक **आगळे-वेगळे** रूप व वैभव प्राप्त झाले आहे. अशातच येथे येणा-या पर्यटकांना एक वेगळी पर्वणी ठरू लागली आहे. या बाजारपेठेत पाऊल ठेवताच तुम्हाला रोषणाई असलेल्या मोठमोठ्या बिल्डिंग्ज दिसतील. **विद्युत रोषणाई** हे या बाजारपेठेचे आणखी एक वैशिष्टय. **स्मितहास्य करुन विनम्र सेवा देणारे विक्रेते** आणि **भावाचा कोणताही मोलभाव न करणारे ग्राहक** यांचे **अनोखे नाते** या बाजारपेठेत पहावयास मिळते.

अमेरिकेच्या दौ-यावर आलो असताना या बाजारपेठेला भेट देण्याचा योग आला. अडीच-तीन तासांच्या सैरसपाटीनंतर येथील बाजारपेठेचा आलेला **अनुभव जीवन समृद्ध करणारा** होता, हे मात्र या वेळी नक्कीच सांगता येईल.

**येथे दुकान कसे असावे, मालाची मांडणी कशी करावी, ग्राहकांशी संवाद कसा असावा, सेवा कशी असावी हे सर्व कांही शिकण्यासारखे व अनुकरणीय आहे.**

☆☆☆

# ८. न्यूयॉर्क - स्टॅच्यू ऑफ लिबर्टी (स्वातंत्र्यदेवतेचा पुतळा)




आज आम्ही अमेरिकेच्या न्यूयॉर्क शहरातील **Statue of Liberty** ला भेट दिली. **स्वातंत्र्यदेवतेचा पुतळा** किंवा **Statue of Liberty** ही अमेरिकेच्या न्यूयॉर्क शहरातील **लिबर्टी आयलंडवर** उभारण्यात आलेली एक भव्य अशी वास्तू आहे.

१} अमेरिकेच्या स्वातंत्र्याला **१०० वर्षे पूर्ण झाल्याप्रित्यर्थ फ्रान्सकडून** अमेरिकेला भेट मिळालेल्या ह्या पुतळ्याचे **२८ ऑक्टोबर १८८६** रोजी उद्घाटन करण्यात आले. उजव्या हातात **स्वातंत्र्याची ज्योत** घेऊन उभ्या असलेल्या एका स्त्रीचा हा पुतळा **अमेरिकेमध्ये प्रवेश करण्याऱ्या पाहुण्यांचे स्वागत करतो.**

२} जुन्या काळात युरोपातून बोटीने अमेरिकेत येणाऱ्या लोकांना **अमेरिकेचे पहिले दर्शन** स्वातंत्र्यदेवतेच्या पुतळ्याद्वारे होत असे. आजही हा पुतळा अमेरिकेतील सर्वात **महत्त्वाच्या ऐतिहासिक ठेव्यांपैकी एक** आहे.

३} **१५१ फूट उंच** असलेल्या स्वातंत्र्यदेवतेच्या पुतळ्याच्या उजव्या हातात ज्योत असून डाव्या हातात पुस्तक आहे. त्यावर ४ **जुलै १७७६ ('July IV MDCCLXXVI')** ही अमेरिकेच्या **स्वातंत्र्यदिनाची तारीख** लिहिलेली आहे. पुतळ्याची पाया धरून उंची **३०५ फूट** असून पुतळ्याच्या मुकुटात ज्या **७ खिडक्या** आहेत, त्या **जगातील ७ खंड** दर्शवतात. उजव्या हातातील ज्योत प्रकाश दर्शवते तर डाव्या हातातील पुस्तक ज्ञान दर्शवते. २.४ मिलिमीटर जाडीच्या तांब्याच्या पत्र्यापासून हा संपूर्ण पुतळा बनवलेला असून आतून त्याला लोखंडाच्या/ स्टीलच्या पट्ट्यांचा आधार दिला आहे असे तिथे लिहून ठेवले आहे.

४} सुरुवातीला १८८६ मध्ये हा पुतळा **तांब्याच्या** रंगाचा दिसत असे मात्र त्यानंतर पुढील जवळपास **३० वर्षांत** तांब्याचा हवेशी आणि पाण्याशी झालेल्या संयोगामुळे **हा पुतळा हिरवा** झाला. हे ठिकाण एका बेटावर बनविले असल्याने या ठिकाणी जाण्यासाठी **बोटीतून प्रवास** करावा लागतो. सदरची बोट सुविधा ही **न्यूयॉर्क** व **न्यूजर्सी** या दोन्ही शहरातून उपलब्ध आहे.

५} या पुतळ्याची **भव्यता थक्क करणारी** आहे. ७ खंडातील लोकांना **प्रकाश दाखवून ज्ञान देण्यासाठीच** जणू  हा पुतळा उभारण्यात आला असावा असे म्हणता येईल.

# ९. न्यूयॉर्क - एंपायर स्टेट

१} **एंपायर स्टेट** ही अमेरिकेतील **न्यूयॉर्क** शहरातील अनेक **अतिउंच इमारतीपैकी एक अतिशय सुंदर अशी इमारत** आहे.

२} या इमारतीतील ८० वा आणि ८६ वा मजला हा **सर्वांसाठी** खुला आहे. येथील लिफ्ट **५८ सेकंदात** आपल्याला **१ल्या मजल्यावरून ८०व्या मजल्यावर घेऊन जाते.**

३} या दोन्ही मजल्यावरून आपल्याला **संपूर्ण न्यूयॉर्क** अतिशय सुंदर प्रकारे न्याहाळता येते. येथून संपूर्ण न्यूयॉर्कचे होणारे दर्शन अतिशय नयन रम्य आहे.

४} ही इमारत **मॅनहॅटन** या उच्चभ्रू अशा वसाहतीत उभारण्यात आलेली आहे. या परिसरात अशाच

प्रकाराच्या अतिसुंदर आणि अतिउंच अश्या जवळपास **५०००** पेक्षा अधिक इमारती आहेत.

५} आम्ही सूर्यास्ताच्या वेळी तेथे उपस्थित असल्यामुळे आम्हाला **सूर्यास्तापुर्वी** व **सूर्यास्तानंतर** अश्या दोन्ही सौंदर्याचा **अविस्मरणीय** असा अनुभव घेता आला. सूर्यास्तानंतर दिसणा-या न्यूयॉर्क शहरातील लाईटस् पाहून पृथ्वीवर जणू कुणी लाखो मौल्यवान रत्ने उधळून टाकली असावीत असा भास होत होता.

☆☆☆

## १०.  अमेरिकेतील भारतीय हॉटेल्सची लज्जत भारीच..

मित्रांनो, १० दिवसांपूर्वी जेव्हा मी, माझी बायको आणि २ मुले अमेरिकेसाठी रवाना झालो तेव्हा **आई, आजी, मावशी** आणि **सासुबाई** या सर्वांनीच खाण्यासाठी भरपूर वेगवेगळे पदार्थ बनवून दिले होते. त्यामुळे पाहिले ३ / ४ दिवस खाण्या पिण्याचा प्रश्न आला नाही.

१} येथे आल्यावर पहीले ४ दिवस तर इथल्या वातावरणाशी **जुळवून** घेण्यात जातात. कारण भारतात आणि अमेरिकेच्या वेळेत जवळपास **११:३० तासांचा फरक** आहे. **म्हणजे जेंव्हा भारतात दिवस असतो तेंव्हा अमेरिकेत रात्र आणि जेंव्हा भारतात रात्र असेल तेंव्हा अमेरिकेत दिवस.** त्यामुळे आपल्याला भारतीय वेळेनुसार खाण्याची व झोपण्याची सवय **इकडे पूर्णपणे बदलावी लागते.**

२} या फरकाशी अनुकूल होण्यासाठी लागणाऱ्या वेळेस **'जेट लॅग इफेक्ट'** असे म्हणतात. त्यामुळे अमेरिकेत गेल्यावर पहीले ४ दिवस आपल्याला दुपारी गाढ झोप येते, भल्या पहाटे म्हणजेच जवळपास पहाटे ३ वाजता कडकडून भूक लागते. पण तरीही हा **अनुभव एक वेगळीच मजा देऊन जातो.**

३} सोबत भरपूर खायला असलेल्या सर्व पदार्थांचा ३-४ दिवसांतच फड़शा पड़ला. मला काळजी होती ती दोन्ही लहान मुलांची.. त्यांच्या भारतीय खाण्याची. मी इथे अमेरिकेत माझ्या **साड्डूच्या** घरीच रहायला असल्याने, त्याच्या **घरी भारतीय जेवणाची अत्यंत सुंदर** व्यवस्था झाली. **पण बाहेर गावी फिरायला गेल्यावर वर काय??** हा प्रश्न मनात घोळतच होता.

४} पण सांगायला आनंद वाटतो की **अमेरिकेत सर्व चांगल्या शहरात उत्तम अश्या भारतीय हॉटेल्सची** सुंदर अशी सोय आहे. साड्डू गेल्या अनेक वर्षांपासून अमेरिकेत स्थायिक असल्याने त्यांना उत्तम भारतीय हॉटेल्सची **इत्थंभूत माहितीही** होती.

५} गेल्या १० दिवसात अमेरिकेतील वेगवेगळ्या भारतीय हॉटेल्समध्ये चहा-पाण्यासाठी किंवा जेवणासाठी भेट दिलेल्या **काही भारतीय हॉटेल्सची फोटो** खास आपल्यासाठी देत आहे. भेट दिलेल्या सर्व हॉटेल्समध्ये इतकी **उत्कृष्ट आणि चवदार** अश्या भारतीय भोजनाची व्यवस्था झाली की **काही वेळा वाटलेच नाही की आपण भारता बाहेर आहोत.** येथील भारतीय हॉटेल्समध्ये आम्हाला जवळपास सर्वच भारतीय पदार्थ **अस्सल भारतीय चवीसह** चाखावयास मिळाले

६} पण एक गोष्ट **आवर्जून** सांगितल्या शिवाय राहवत नाही ती म्हणजे.. **मातृभूमीत आपल्या आईने 'भरपूर प्रेम टाकून बनविल्या भाकरीची' आणि 'भरपूर मायेचा तडका लाऊन बनविल्या भाजीच्या' चवीची सर येथील कोणत्याही हॉटेल्समध्ये आली नाही आणि कधी येणारही नाही.. जय हिंद - जय महाराष्ट्र.**

☆☆☆

# ११. ड़ोळयाचे पारणे फेडणारा - नायगारा धबधबा

अमेरिकेत आल्यावर **न चुकता बघण्याचे** आणि **ड़ोळयाचे पारणे फिटावे** असे ठिकाण म्हणजे.. **नायगारा धबधबा.** नायगारा धबधबा हा जगातील सर्वांत मोठ्या धबधब्यांपैकी एक आहे. हा धबधबा अमेरिकेतील **नायगारा नदीवर असून अमेरिका आणि कॅनडा ह्या देशांच्या सरहद्दीवर** आहे.



१} हे ठिकाण न्यूयार्क राज्यातील **बफेलो** या शहरापासून जवळपास **२८ किमी** अंतरावर आहे. ज्यात **प्रत्येक मिनिटाला ४० लाख चौरस फूट पाणी** पडते असा हा त्या अर्थाने, **जगातील सर्वांत मोठा धबधबा** आहे.

२} **अमेरिका** आणि **कॅनडा** या दोन देशांना जोडणारा आणि नायगारा या नदीवरून जाणारा **रेनबो पूल** हा देखील येथून पूर्णपणे दिसतो. परंतु अमेरिकेतून कॅनडा देशात प्रवेश करण्यासाठी आपल्याला **कॅनडा देशाचा व्हिसा** लागतो.

३} नायगारा धबधबा हे नाव **तीन वेगवेगळया धबधब्याच्या समूहाला** देण्यात आले आहे. ते म्हणजे.. **हॉर्स शू धबधबा, अमेरिकन धबधबा** आणि **ब्रिड़ल वेल धबधबा.** या तिन्ही धबधब्यातील

**सर्वात मोठा धबधबा म्हणजे हॉर्स शू धबधबा, जो घोड्याच्या नालेच्या** म्हणजेच **इंग्रजीतील मोठ्या 'U'** या अक्षराच्या आकाराचा आहे.

४} **१८४८ साली** सुरू झालेली **'मेड ऑफ द मिस्ट टूर'** या नावाची बोट आजही आपल्याला **'नायगाराची सफर'** घडवते. धबधब्याचे पाणी पडल्यावर खालच्या नदीतल्या पाण्यामध्ये सफर करायची बोट म्हणजे **'मेड ऑफ द मिस्ट टूर' (Maid of the mist Tour).** तिकीट काढायचे आणि निळया किंवा पिवळया रंगाचा रेनकोट अंगावर चढवायचा आणि 'मेड ऑफ द मिस्ट टूर'च्या बोटीत डेकवर जाऊन उभे राहायचे. ही बोट आपल्याला **दोन्ही धबधब्यांच्या अगदी जवळून चक्कर** मारून आणते. तिन्ही धबधब्यांच्या फेसाळणाऱ्या प्रवाहाचे उडणारे पाणी अंगावर घेत या बोटीतून फिरायचे. पाण्याचे तुषार इतके जोरात अंगावर येत असतात की आपण **त्यात चिंब भिजूनच** जातो. त्यामुळे धबधब्याच्या जवळून फोटो काढणे हे जरा अवघडच जाते पण स्वर्गिय आनंद कसा असेल याची प्रचिती येते.

५} बोटीतून तिन्ही धबधब्याच्या अगदीच जवळपर्यंत जाऊन या तिन्ही **अद्भूत** व **अलौकिक निसर्गसौंदर्याची** मजा आपण अनुभवू शकतो. त्यातल्यात्यात जेव्हा आपली बोट ही सर्वात मोठ्या **धबधब्याच्या U आकारातून** भ्रमण करते, तेव्हा दिसणारे **निसर्ग सौंदर्य हे शब्दात वर्णन करण्यापलीकडचे आहे. येथे आल्यावर जणू सारे जग विसरायला होते.**

६} रात्री या धबधब्यांवर **वेगवेगळया रंगाची रोषणाई** करण्यात येते तर **दर शनिवारी** व **रविवारी** रात्री ठिक १० वाजता **सुंदर अशी आतषबाजी** करण्यात येते.

७} **मनोहर निसर्ग सौंदर्य** आणि **प्रचंड वीजनिर्मिती** या दोनही कारणांसाठी हा धबधबा **प्रसिद्ध** असून दर वर्षी **कोट्यवधी पर्यटक** केवळ हा धबधबा पाहण्यासाठी **अमेरिका** आणि **कॅनडा** या दोन्ही देशांत येतात.

८} **दूधासारखा पांढराशुभ्र, मनातील सर्व विचार शांत करणारा खळ-खळ आवाज, धबधब्यातून उडणारे, अंग चिंब करणारे आणि हवेहवेसे वाटणारे पाण्याचे ते अतिसूक्ष्म असे तुषार..** हा सर्व आनंद नक्कीच **स्वर्गानंदापेक्षा कमी नाही** असे मला वाटते.

# १२. पेज - ॲन्टेलोप कॅनिअन आणि हॉर्स-शू-बेंड़

अमेरिकेच्या **ॲरिझोना राज्यातील पेज शहराजवळील** ॲन्टेलोप कॅनिअन आणि हॉर्स-शू-बेंड़ या दोन ठिकाणी भेट दिली.

१} पहिले ठिकाण म्हणजे **ॲन्टेलोप कॅनिअन..** सहजपणे समजण्यासाठी आपण त्याला **निसर्गनिर्मित गुहा** म्हणूया. पेज हे एक वाळवंटी भागात वसलेले शहर आहे. या भागात उन्हाळा व पावसाचे प्रमाण जास्त असल्याने, हजारो वर्षांपुर्वी या ठिकाणी विशिष्ट भागात **वाळवंटातील रेती/वाळूच्या टेकड्या बनल्या.**

२} कडक उन्हामुळे या टेकड्या कठीण बनून त्यांना तडे पडले, व अति पावसाळयात या भेगांमधून पाणी जोरात वाहून घर्षणामुळे **त्यातील अंतर जवळपास दोन व्यक्ती एकाचवेळी येऊ-जाऊ शकतील एवढे वाढले.**

३} या गुहा आतील बाजूंनी **गुलाबी-लालसर रंगाच्या** दिसतात. गुहेच्या आतील बाजूच्या दगडात भरपूर प्रमाणात ओलावा असलेल्या बाहेरच्या बाजूला कडक उन असतानाही **गुहेच्या आतील भागातील गारवा हवाहवासा वाटतो.** काही ठिकाणी या गुहेच्या वरील भागातून **सूर्यप्रकाश पूर्णपणे खाली उतरून आपल्याशी गप्पा मारायला भूपृष्टावर आला की काय?** असा भास होतो.

४} दुसरे ठिकाण म्हणजे **हॉर्स-शू-बेंड़..** जो घोड्याच्या नालेच्या म्हणजेच **इंग्रजीतील मोठ्या 'U'** या अक्षराच्या आकाराचा **निसर्गनिर्मित जल-प्रवाह** आहे. ठरवून **सूर्यास्ताच्या वेळी** तेथे पोहोचल्याने, आम्हाला निसर्गनिर्मित या अद्भुत अशा ठिकाणाला **डोळे भरून बघून, कॅमेऱ्यात कैद करता आले.** अमेरिकेत असे अनेक नैसर्गिक चमत्कार जागो-जागी पहावयास मिळतात.

## १३. लास वेगास - वाळवंटातील हिरवळ

लास वेगासला विमान उतरायला लागले तत्क्षणी समोर दिसणाऱ्या सुप्रसिद्ध **'वेगास स्ट्रिपने'** (वेगास मधील मुख्य रस्त्याने) मनाला भुरळ घातली. **स्पॅनिश भाषेत लास वेगासचा** अर्थ **वाळवंटातील हिरवळ** असा सांगितला जातो.

१} नजरेच्या टप्प्यात येणाऱ्या मंडाले बे हॉटेलच्या सोनेरी झळाळणाऱ्या इमारती, त्याच्या शेजारी लक्सरच्या काळ्याभोर पिरॅमिड, त्यापुढे दिसणारा एक्सकॅलिबरचा लहान मुलांच्या डिस्ने या परीकथेतील प्रशस्त राजवाडा, न्यूयॉर्कचा स्टॅच्यू ऑफ लिबर्टी, पुढे नजरेच्या टप्प्यात येणारा आयफेल टॉवर.. इत्यादींची हुबेहुब प्रतिकृती असणारे **हॉटेल्स कम कसिनो पाहून प्रवासाचा शीण कुठल्या कुठे पळून गेला होता.**

२} एकाच लास वेगासला हे सर्व आहे. सुट्टीचा आनंद घेणे, खरेदी करणे, रात्रीची खास करमणूक आणि जुगार यांच्यासाठी प्रसिद्ध असलेले अमेरिकेतील **हे सुप्रसिद्ध स्थळ जणू डोळे मिचकावून खुणावत होते.** लास वेगास एअरपोर्टला उतरले की स्लॉट मशीन्सचा खणखणाट ऐकू येतो असे पूर्वी एका लेखात वाचले होते. **माणसाला जुगाराची आवड तरी किती असावी हे सांगणे अवघड आहे.**

३} **आयुष्यच जेथे एक 'जुगार' आहे, तेथे प्रत्येक माणूस 'जुगारीच' ठरेल असे वाटते.** लास वेगासला उतरल्यावर स्लॉट मशीन्सवर बसलेल्या स्त्री, पुरूष, म्हातारे कोतारे पाहून त्याची प्रचीती आली. वेगास शहरातील दोन दिवस **'द वेस्ट-इन'** या हॉटेलमध्ये राहायचे होते. त्या हॉटेलात प्रवेश केला, आजूबाजूला नजर फिरवली तशी छाती दडपली. याला हॉटेल म्हणावे की **एखादे लहानसे स्वयंपूर्ण नगर असा प्रश्न पडला??? रेस्टॉरंट्स, लहान-मोठ्या गोष्टींची दुकाने, बेकरी, गाड्या भाड्याने देण्याघेण्याचे स्थान, सहलींसाठी आरक्षण केंद्रे, जलतरण तलाव, स्पा आणि त्यांच्या दरम्यान पसरलेला अवाढव्य कसीनो.**

४} दोन दिवस या हॉटेलचा पाहुणचार घेऊन, वेगासच्या १२ महिने दिवाळी असलेल्या रस्त्यांवरून फेरफटका मारला, करमणुकींचे काही कार्यक्रम पाहिले, कसीनोमध्ये वेळ काढला, खाद्यपदार्थांची लयलूट असणाऱ्या बफे जेवणपद्धतीचा आस्वाद लुटला, **बेलाजियो या हॉटेल समोरील सरोवरातील नयनरम्य संगीतमय कारंज्यांचा कार्यक्रम विशेष उल्लेखनीय होता.**

५} या मायानगरीत एकदा पाऊल टाकले की **दिवस आहे की रात्र याचे भान राहत नाही.** आपल्याला कसीनो आणि रात्रीच्या कार्यक्रमांवर किती डॉलर्स खर्च करायचे याचा अंदाज आधीच घेऊन ठेवावा. **वाळवंटातील ही हिरवळ बऱ्याचजणांसाठी वाळवंटातील मृगजळ ठरल्याचे अनुभव ऐकू येतात म्हणून हा सावधगिरीचा इशारा..**

☆☆☆

# १४. लास वेगासचे पहिले वैशिष्ट्य

लास वेगासचे **पहिले वैशिष्ट्य हे की शहर अगदी भर वाळवंटात** वसलेले आहे. सामान्यतः गांवे/ शहरे ही एखाद्या जलाशयाच्या जवळ वसलेली असतात. **लास वेगास हे त्याला अपवाद!**

१} या शहराच्या चोहोबाजूंना रेताड, वैराण वाळवंटाशिवाय दुसरं काहीही नाही!! तपमान **उन्हाळयात** ४५ **डिग्री** आणि **थंडीत** ४ **डिग्री सेल्सिअस** असं बदलत असतं. इथे काहीही पिकत नाही, काहीही वस्तू तयार करायचे कारखाने नाहीत. पाण्यासकट प्रत्येक गोष्ट इथे दूरवरून वाहून आणावी लागते. त्यामुळे इथे महागाई प्रचंड आहे! पण गंमत अशी की **इथे कुणी त्याबद्दल फारशी तक्रार करतांना दिसत नाही!!**

२} लास वेगास हे **जुगाऱ्यांचं शहर** म्हणून जगप्रसिद्धच आहे. पण अगदी खरं म्हणजे हे **"पैशाच्या पुजाऱ्यांचं"** शहर आहे. पैसा हा इथला देव! इथे **"सर्वदेव नमस्कारः डॉलरंप्रति गच्छती"!!** इथे पैसे उधळायलाच माणसं येतात.. असं म्हणतात.

३} वेगासमध्ये वेगवेगळया असंख्य प्रकारचे जुगार खेळायची व्यवस्था आहे. **जगभरचे लोक इथे येऊन नशीब अजमावत असतात.** प्रत्येक हॉटेलच्या अनेक मजल्यांवर इथे अतिप्रचंड कॅसिनो आहेत. **कमीतकमी २५ सेंट/पैज पासून १०,००० डॉलर/पैज** असे दर मी पाहिले आहेत. त्याहीपेक्षा महागडे खेळ असतील तर **मला त्याची कल्पना नाही.**

४} **अठरा वर्षांखालील लोकांना** जुगाराच्या कॅसिनोत प्रवेश नसतो. माझ्या पहाण्यात **हे पथ्य** अगदी कटाक्षाने पाळले जाते! **(कारण एका कॅसिनोत मला माझ्याच अठरा वर्षे पूर्ण झाल्याबद्दलचा पुरावा मागण्यात आला.)**

५} हे जुगार **बारा महिने - चोवीस तास** चालू असतात. खेळून तुम्ही थकलात तर तुमच्या बसल्या जागेवर खाद्य-पेय आणून देणारे सेवक असतात, तुमच्याबरोबर लहान मुलं असली तर त्यांना सांभाळण्यासाठीची सोय असते, थकलेल्या म्हाताऱ्या नातेवाईकांना सोबत करण्यासाठी माणसं उपलब्ध असतात!!

६} **"आम्ही बाकीची सगळी चिंता करतो, तुम्ही फक्त खेळा"** हा इथला मंत्र आहे!!! माणसं इरेला पडून खेळतात! काही जिंकतातही, पण बरीचशी खिसा हलका करूनच परत जातात!! पण गंमत अशी की त्याबद्दल तक्रार करतांना मी कोणालाच ऐकले नाही. **वेगासला पैसे जिंकून श्रीमंत होण्यासाठी जायचं नसतं तर एक धुंद, अविस्मरणीय अनुभव घेण्यासाठी जायचं असतं!!**

(क्रमश;)

☆☆☆

# १५. लास वेगासचं दुसरे वैशिष्ट्य

लास वेगासचं **दुसरे वैशिष्ट्य म्हणजे इथली हॉटेल्स व रेस्टॉरंट्स!!** येणाऱ्या प्रवाशांच्या सोईसाठी इथे अतिप्रचंड हॉटेल्स बांधलेली आहेत आणि ती बहुतेक सर्व एकाच मध्यवर्ती रस्त्याच्या दोहोबाजूला उभारलेली आहेत. **या रस्त्याला इथे याला लास वेगास स्ट्रीप म्हणतात**

१} **दोन दिवसांत** आम्ही या ठिकाणच्या **बेलाजिओ, सीझर्स पॅलेस, लक्झर पिरॅमिड, मॅन्डाले बे, व्हेनेशिअन, सर्कस-सर्कस, एक्सकॅलिबर** या ७ हॉटेल्स कम कॅसिनो ना **भेट देण्याचा प्रयत्न केला.** मी प्रयत्नच म्हणेन, कारण एकच हॉटेल व्यवस्थित बघण्यास आपल्याला **एक पूर्ण दिवसही कमी पडेल.**

२} मोठ्या हॉटेलांमध्ये सरकते जिने असणं यांत अमेरिकेत तरी काही नाविन्य नाही. पण वर नमूद केलेल्या या हॉटेलात त्याच्या लगतच्या इतर दोन हॉटेलांमध्ये जाण्यासाठी **लहानशी आगगाडी** म्हणजेच **मोनो-ट्रेन** आहे. ही आगगाडी **स्वयंचलित असून हॉटेलात रहाणाऱ्या किंवा भेट देणाऱ्या पर्यटकांना साठी एक्सक्लूजिव्ह आणि फुकट आहे!**

३} गंमत म्हणजे बाहेरून हॉटेलला प्रदक्षिणा जरी घातली, **मी वेड्यासारखी इरेला पडून एका हॉटेलला घातली,** सव्वा तास लागला आणि मला चालण्याची सवय असुनही रात्री पाय जाम दुखले!! कालच मी तुम्हाला सांगितलं ना, **"चालण्यात वेळ फुकट घालवू नका, त्यापेक्षा त्या वेळात चार गेम जास्त खेळा!!!":)** हा इकडचा फंडा आहे.

४} **मात्र लास वेगासची मजा लुटायला माणूस जुगारी असण्याची मुळीच आवश्यकता नाही.** मला स्वतःला जुगार तर सोडाच पण साधी रम्मी सुद्धा नीट खेळता येत नाही. **मला वेगास भावतं ते वेगळ्या गोष्टींबद्दल!!** इथे अनेक **उत्तमोत्तम रेस्टॉरंटस व बार** आहेत! जगातील कुठलेही पेय इथे मिळण्याची सोय आहे. ते **अल्कोहोलिकच** असायला पाहिजे असे नाही, अगदी **भारतीय चहा** सुद्धा

इथे उत्तम मिळतो. **नाहीतर अमेरिकेत भारतासारखा अमृततुल्य चहा मिळणं फार दुरापास्त आहे!!**

५} **वेगास मधील लोक ठार वेडे आहेत का?** असा प्रश्न पडतो, कारण इथल्या लोकांनी **पर्यटकांना आकर्षित** करण्यासाठी येथे इतके **भव्य** व **सुंदर** असे हॉटेल्स व रेस्टॉरंट्स बांधले आहे. आणि त्यापुढील म्हणजे प्रत्येक हॉटेलमध्ये **काही ना काही नाविन्यपूर्ण करण्याचा त्यांचा मानस..** की जो पाहून **मन आणि डोक थक्क झाल्याशिवाय राहणार नाही.**

६} उदाहरण म्हणून मागील अंकात मी तुम्हाला '**संगीतमय कारंजाच्याबद्दल**' बोललो होतो.. त्यात जास्त काही नावीण्य मला वाटले नाही जेव्हा.. मी दुसऱ्या ठिकाणी **चॉकलेटचा झरा** आणि **ज्वालामुखीचा आग ओकणारा झरा** बघितला. त्यापुढील म्हणजे एका अठ्ठावीस मजली हॉटेलच्या दुसऱ्या मजल्यावर तर चक्क **कृत्रिमरीत्या सुंदर आकाश बनवून त्याखाली नौका विहारासाठी अप्रतिम असा तलाव** बनविला आहे. जिथे रात्री १० वाजता जरी आपण नौका विहाराचा आनंद घेतला, तरी आपल्याला **संध्याकाळचे ६ वाजल्याचा अनुभव येतो.. मी आधीच सांगितले होते.. वेगासचे लोक ठार वेडे आहेत.**

☆☆☆

# १६. ऑरलँडो: 'पूर्वेचे हॉलिवूड'

१} अमेरिकेच्या **फ्लोरिडा** या राज्याला **तिन्ही बाजूंनी नैसर्गिक समुद्रकिनारा** लाभल्याने हे राज्य **पर्यटनासाठी अव्वल स्थानावर** आहे. या ठिकाणी अनेक निसर्गनिर्मित व मानवनिर्मित समुद्रकिनारे आहेत. या **सृष्टीसौंदर्याचा मनमुराद आनंद लुटण्यासाठी** दरवर्षी जगातील **करोडो पर्यटक** या राज्यास भेट देतात.

२} **फ्लोरिडा राज्यामधील** एक मोठे शहर **ऑरलँडो**. ओरलँडो शहराची लोकसंख्या २.३८ लाख तर ओरलँडो महानगर क्षेत्राची लोकसंख्या **२०.८२ लाख** इतकी आहे. ओरलँडो हे फ्लोरिडामधील पाचव्या तर अमेरिकेतील ८०व्या क्रमांकाचे मोठे शहर आहे. येथील **पहिली भाषा इंग्रजी** असून **दुसरी स्पॅनिश** आहे.

३} ऑरलँडो शहरालगतचे **सुंदर समुद्रकिनारे** म्हणजे **क्लिअर-वॉटर बीच, न्यु-स्मेरना बीच, डेटोना बीच** आणि **कॅनवरल नॅशनल सी-शोअर.** यातील **'क्लिअर-वॉटर बीच'** या समुद्रकिनाऱ्याला आम्ही भेट दिली. **हा समुद्रकिनारा अतिशय सुंदर व स्वच्छ असा असून तेथील वाळू ही पांढऱ्या रंगाची आहे.**

४} समुद्रकिनारे व भरपूर पर्जन्यवृष्टी लाभलेल्या, अमर्याद असा हिरवा शालू पांघरलेले हे शहर **'जगातील सर्वोत्कृष्ट गोल्फ क्लब शहराच्या'** अव्वल तीन मध्ये बाजी मारून जाते.

५} जसे महाराष्ट्रातील **"पंढरपूरला दक्षिणेची काशी"** असे संबोधले जाते अगदी त्याचप्रमाणे **ऑरलँडो शहराला Hollywood East** म्हणजेच **"पूर्वेचे हॉलिवूड"** असे म्हटले जाते. कारण या ठिकाणी बऱ्याच हॉलिवूड चित्रपटांचे चित्रीकरण करण्यात येते.

६} **पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी इथले लोकही लास वेगासच्या लोकांपेक्षा काही कमी नाहीत..** उदाहरणार्थ आम्ही ज्या हॉटेलमध्ये थांबलो होतो, तेथून हाकेच्या अंतरावर **वंडर वर्क** ही **Upside Down..** म्हणजेच **इमारतीचा पाया वर** आणि **छत खाली** अश्या पध्दतीने बांधण्यात आलेली ही वास्तू. अपघातग्रस्त या वास्तूच्या बाजूला धुराचे लोट उठलेत, असे भासविण्यासाठी कृत्रिम वाफही अधुनमधुन सोडली जाते. **'शीर्षासन' अवस्थेतील व भर चौकातील ही इमारत, नवख्या पर्यटकांना चकवा देण्यात अगदीच समर्थ आहे.**

७} ओरलँडो या शहरात **१९६५** मध्ये खरी पर्यटन क्रांती घडली जेव्हा **वॉल्ट डिजने** यांनी **वॉल्ट डिजने वर्ल्ड** हे रिसॉर्ट बांधण्याचे अधिकृतरीत्या सांगितले. ओरलँडो हे अमेरिकेतील सर्वात लोकप्रिय पर्यटनस्थळ आहे. **वॉल्ट डिजने वर्ल्ड रिसॉर्ट, युनिव्हर्सल ओरलँडो रिसॉर्ट व सीवर्ल्ड ओरलँडो** ही तीन **अतिविशाल मनोरंजन उद्याने (थीम पार्क)** ओरलँडोमध्ये स्थित आहेत. या शहराला **"जगातील थीम पार्कच्या राजधानीचे स्थान"** बहाल करण्यात आले आहे.

८} गुगल वरील माहिती नुसार वर नमूद केलेल्या ३ थीम पार्क मध्ये **३२ हून अधिक हॉटेल्स असून २५ हजारांपेक्षा अधिक रूम्स** पर्यटकांसाठी उपलब्ध आहेत. वरील थीम पार्क भेटी मध्ये आलेल्या **रोमांचकारी अनुभवाचे** कथन **पुढील भाग मध्ये..**

☆☆☆

# १७. ऑरलँडो: 'थीम पार्कची राजधानी'

मागील भागात सांगितल्याप्रमाणे **वॉल्ट डिजने वर्ल्ड रिसॉर्ट, युनिव्हर्सल ओरलँडो रिसॉर्ट** व **सीवर्ल्ड**

**ऑरलँडो** ही तीन **अतिविशाल मनोरंजन उद्याने (थीम पार्क)** ओरलँडोमध्ये स्थित आहेत. या शहराला **"जगातील थीम पार्कच्या राजधानीचे स्थान"** बहाल करण्यात आले आहे. वरील रिसॉर्टमध्ये भेट हे **एका रोमांचकारी अनुभवाप्रमाणे होते**, या ठिकाणी आढळून आलेल्या काही बाबी..

१} **प्रत्येक रिसॉर्ट चे ॲप गुगल प्ले-स्टोअर मध्ये उपलब्ध आहेत.** त्यामुळे आपण कोठे आहोत; आपल्याला कोठे जावयाचे आहे; कोठे कोणत्या राईड्स आहेत; प्रत्येक राईड्सची कोणती वैशिष्ट्ये आहेत; ती किती वर्षांपर्यंतच्या मुलांसाठी व मोठय़ांसाठी उपलब्ध आहेत; उपहारगृहे कोठे आहेत; त्याठिकाणी कोणता मेनू किती वाजेपर्यंत मिळेल; खरेदीसाठी कोठे कोणती दुकाने आहेत; स्वच्छतागृह कोठे आहेत.. इत्यादींची इत्यंभूत माहिती आपल्याला **क्षणार्धात एका क्लिकवर** मिळू शकते.

२} **सर्व ठिकाणी लहान मुलांची बाबागाडी किंवा अपंगांसाठीच्या खुर्च्या घेऊन जाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.** अशा प्रकारच्या बाबागाडी किंवा खुर्च्या या ठिकाणी भाडे तत्वावरही घेऊ शकतो. गर्दीच्या ठिकाणी या दोघांसाठी खास प्रवेशद्वारे बनविण्यात आली आहेत. रिसॉर्टमध्ये दर २०० ते २५० फुटांवर स्त्री-पुरुषांसाठी वेगवेगळ्या स्वच्छतागृहांची निर्मिती करण्यात आली असुन, त्या सर्वांमध्ये कमालीची स्वच्छता राखण्यात आली आहे.

३} **पार्कमध्ये जागोजागी Sprinkler Fan आणि Dryers बसविण्यात आले आहेत.** Sprinkler Fan म्हणजे जसे आपण लग्न समारंभात **अत्तर फवारणारे पंखे** बसवतो, तसेच या ठिकाणी उकाडा जास्त वाटत असल्यास जागोजागी बसवलेल्या हवेहवेसे गार पाण्याचे तुषार अंगावर मारणाऱ्या पंख्याचा आनंद आपण घेऊ शकतो. तसेच पाण्यातून जाणाऱ्या राईड्स खेळून आल्यावर उबदार अशा Dryers चा वापरही आपण करू शकतो.

४} **फिरत्या सभागृहाचा आगळावेगळा अनुभव मी या ठिकाणी पहिल्यांदाच अनुभवला.** सभागृह व व्यासपीठ यांची रचना मोठ्या भाकरीवरती लहान भाकरी ठेवल्यासारखी होती. सभागृह व व्यासपीठ या दोघांची विभागणी, भाकरीच्या चतकोराप्रमाणे करण्यात आली होती. त्यातील व्यासपीठ हे स्थिर असून, एकाच चतकोर सभागृहात प्रेक्षकांच्या बैठकीची व्यवस्था करण्यात आली होती. नाटक हे चार अंकात विभागले असून, **त्यातील एक अंक संपल्यावर सभागृहाच्या बैठकीचा एक चतकोर भाग हा दुसऱ्या अंकासाठी पुढील व्यासपीठासमोर बैठक व्यवस्थेसह सरकत असतो.**

५} **प्रत्येक रिसॉर्ट मध्ये 'अतिशय अत्याधुनिक तंत्रज्ञान सुविधा' राबविण्यात आलेली आहे.** ज्या मध्ये सर्व ठिकाणचा प्रवेश आपल्याला एटीएम कार्ड सारख्या डिजिटल कार्ड वापरून करता येतो. मौल्यवान वस्तू ठेवण्यासाठी बनविण्यात आलेले लॉकर्स हे आपल्या बोटांच्या ठसांवर उघडत व बंद होत असत. सर्व राईड्स च्या ठिकाणचे हे लॉकर्स आपण एक तासासाठी मोफत वापरू शकतो. त्यानंतर हे लॉकर्स आपण प्रत्येक तासासाठी तीन डॉलर मोजून पुढेही वापरू शकतो.

६} **अमेरिकेतील अनेक पर्यटन ठिकाणांप्रमाणे वरील सर्व पार्कमध्ये Loss & Found Centers जागोजागी बनविण्यात आले आहेत.** या ठिकाणी आपण आपल्या हरवलेल्या वस्तूंची नोंद किंवा मिळालेल्या वस्तू जमा करू शकतो. महत्त्वाचे कागदपत्रे असलेली आमची बॅग, **२.५० लाख**

**स्केअरफूट** मध्ये पसरलेल्या युनिव्हर्सल स्टुडिओ मधे हरवल्याचे आम्हाला **लक्षात येण्याअगोदर**, वरील सेंटरवर **कोणीतरी आधीच जमा केल्याचा अनोखा अनुभव** देखील आम्हास येथे आला.

७} वरील एका पार्क मधिल **Animal Kingdom** या विभागात मानवनिर्मित **जंगल सफारीची** आगळी-वेगळी मजा आपण लुटू शकतो. ज्यामध्ये **सिंह, चित्ता, हत्ती, जिराफ, पाणगेंडे, झेब्रा** इत्यादी वन्यप्राणी आपण एकदम जवळून न्याहळू शकतो. याच विभागात **'अवतार'** या इंग्रजी सुप्रसिद्ध चित्रपटातील **पॅनडोरा राईड्चाही** आपण आनंद आपण घेऊ शकतो.

८} **रिसॉर्ट मधील '३डी आणि ४डी राईड्स' हे येथील महत्वाचे आकर्षण.** ज्यामध्ये माऊंट एव्हरेस्ट, स्पाइडरमैन, ट्रांसफार्मर, ज्युरासिक पार्क, हॅरी पॉटर, किंगकॉगं, पायरेटस् ऑफ कैरिबियन आदी **एक-से-बढकर-एक** राईड्सचा अद्भूत आणि अभूतपूर्व अशा आनंदाचा अनुभव आपल्याला घेता येईल. **काही राईड्स या सोप्या असल्यातरी, काही राईड्स मध्ये आपल्याला आपल्या इष्ट देवाची आठवण झाल्याशिवाय, ती राईड पुर्ण होत नसे, हेही तितकेच खरे:)** तरीही सर्व राईड्स मध्ये कमालीची सुरक्षितता बाळगण्यात आली होती.

९} **संध्याकाळी 'Disney Street Party' ही खास लहान मुलांसाठी भली मोठी अशी परेड काढण्यात येते.** डिजने मधील बऱ्यापैकी सर्व पात्र यामध्ये आपली उत्तम कला सादर करीत असतात. त्यानंतर रात्री ९ वाजता डिजिटल रोषणाई मध्ये **सिंडरेला पॅलेस येथे अतिशय सुंदर अशी आतषबाजी असते.**

☆☆☆

# १८. सॅन एंटोनियो – सी-वर्ल्ड पार्क (SEA WORLD PARK)

**टेक्सास** राज्यातील **सॅन एंटोनियो** शहरात सुमारे २५० एकर प्रशस्थ जागेमध्ये **सी-वर्ल्ड** वसविण्यात आले आहे. हे पार्क **सी-वर्ल्ड एंटरटेन्मेंटच्या** मालकीची आहे. जलप्रदूषणामुळे जलद गतीने ऱ्हास पावणाऱ्या **समुद्री प्राण्यांना जीवनदान देण्याच्या प्रमुख उद्देशाने** हे भव्य पार्क उभारण्यात आले आहे. **पृथ्वीवर समुद्रीजीव किती प्रकारचे असू शकतात?** या प्रश्नाचे उत्तर येथे आल्यावर मिळते.

उपलब्ध माहितीनुसार **२७ में, १९८८** रोजी या पार्कची निर्मिती करण्यात आली असून पार्कच्या उद्घाटन सोहळयाला **७५००० पेक्षा अधिक** पर्यटकांनी हजेरी लावली होती. टेक्सास राज्यातील **१० प्रमुख पर्यटक स्थळांपैकी** हे एक असून याला **'जगातील सर्वात मोठी  समुद्रीजीव अभ्यास संस्था'** असल्याचा दर्जा बहाल करण्यात आला आहे.

सदर पार्कमध्ये आपल्याला समुदीजीवन, समुद्रीपक्षी, सस्तन प्राणी, अन्य जीवसृष्टी इत्यादी गोष्टींची **अत्यंत बारकाईने माहिती** मिळते. सदर पार्क भव्य असल्याने ते **पाहण्यासाठी संपूर्ण १ दिवस द्यावा लागतो.** या पार्कमधील आवर्जून पहावयाच्या गोष्टी आपल्यासाठी माहितीसाठी खाली देत आहे.

**सी स्टार थिएटर**:  अमेरिकन माणूस **निसर्गवेडा** आहेच शिवाय तो **प्राणीवेडाही** आहे. विविध प्राणी पाळण्याची अमेरिकन लोकांमध्ये खास क्रेझ आहे. मात्र काही कारणांनी हे प्राणी बऱ्याचदा मोकाट सोडून दिले जातात. अश्या सोडून दिलेल्या मोकाट प्राण्यांसाठी येथे एक खास पार्क बनविण्यात आले आहे. ते म्हणजे **'सी स्टार थिएटर'.** या ठिकाणी अश्या प्राण्यांना प्रशिक्षित केले जाते.  त्यांचा येथे एक साधारण अर्ध्या तासाचा कौमेडी शो दाखविण्यात येतो. तो पाहून हसूनहसून पुरेवाट होते. अश्या प्राण्यांमध्ये कुत्री, मांजरी, पांढरे उंदीर, कबुतरे इत्यादी अनेक प्राण्यांचे विनोदी खेळ आपणास पहावयास मिळतात.

**शामू थिएटर:** या ठिकाणी मोठमोठ्या शार्क माश्यांना प्रशिक्षित करून त्यांचे खास शो आयोजित केले जातात. या शो मध्ये हे मासे विविध कलाकौशल्य दाखवितात. समुद्री जलचर

प्राणीही किती बुद्धिमान असतात याची प्रचीती या ठिकाणी येते. जवळपास तासाभराचा हा शो पाहताना भानच हरवून जाते.

**सी-लायन्स प्ले**: सी-लायन हा एक समुद्रीजीव असून त्याचा आवाज **सिंहाच्या डरकाळीप्रमाणे** असल्याने त्याला सी-लायन हे नाव पडले असावे वाटते. हिंस्त्र समुद्रीप्राण्यांना लळा लावून त्यांच्याकडून विविध कसरती करून घेणे हे अमेरिकन माणसाचे मोठे कसबच म्हणावे लागेल.

या शिवाय या ठिकाणी आपल्याला डॉल्फिन्स, पेंग्विन्स, फ्लेमिंगो पक्षी अशा अनेक समुद्रीजीवांच्या प्रजाती या पार्कमध्ये पहावयास मिळते.

**अमेरिकेतील** संपूर्ण वास्तव्यात मला प्राकर्षाने जाणवलेली बाब म्हणजे येथील माणूस हा निसर्ग व प्राण्यांचा अत्यंत चाहता आहे. निसर्ग व प्राण्यांसाठी हे लोक '**अथपासून इतिपर्यंत**' काहीही करण्यास तयार असल्याचे दिसून आले.

☆☆☆

# १९. सॅन एंटोनियो: हॉटेल फेअरमाऊंट

१} **सॅन** एंटोनियो हे लोकसंख्येत **अमेरिकेतील सातव्या** व **टेक्सास राज्यातील दुसऱ्या क्रमांकाचे** शहर आहे. नुकत्याच झालेल्या गणनेनूसार येथील **लोकसंख्या १४ लाख** एवढी आहे. हे शहर **पुरातन काळात बांधलेल्या व अजूनही जश्या च्या तश्या** उभारलेल्या **इमारतींसाठी** प्रसिद्ध आहे.
२} सॅन एंटोनियो या नदीवर वसलेले हे शहर आहे. **सन १९२० मध्ये** या नदीचे एक लहान पात्र शहराच्या मध्यवर्ती भागातून वळवून त्या पात्राच्या दोन्ही बाजूला **पर्यटकांना आकर्षित** करण्यासाठी **अप्रतिम** अशी **हॉटेल्स** व **रेस्टॉरंट्स** बांधण्यात आली. याची मूळ संकल्पना **रोबर्ट एच.एच. हगमन** यांची होती.
३} **तेवीस अप्रतिम हॉटेल्स** व **अगणित लहानमोठे रेस्टॉरंट्स** या काठावर असून एका काठावरून दुसऱ्या काठावर जाण्याची **सोळा पूल** बनविण्यात आले आहेत. संध्याकाळी या पात्राच्या काठावरून भटकंती करून **नौका विहाराचा** आनंद **शब्दात व्यक्त करण्यापलिकडचा** असा आहे. **चाळीस मिनिटांची** ही नौका विहार मोठ्यांसाठी १० डॉलर व मुलांसाठी ४ डॉलर अश्या **माफक दरात** उपलब्ध आहे. नौका चालक या वेळेत या शहराची व इतर निगडित माहिती आपल्याला देतात. त्यांच्याकडून मिळालेली काही माहिती.

४} **फेअरमाऊंट हॉटेल** हे तीन मजली अतिशय सुरेख व जुने हॉटेल होते. अनेक देशांत असणाऱ्या हॉटेलांची साखळी असणाऱ्या **'मैरियट हॉटेलने'** या ठिकाणचे फेअरमाऊंट हॉटेल हे हॉटेल **पाडून त्या ठिकाणी एक अत्याधुनिक तंत्रज्ञान** आणि **सुविधांची पर्वणी** असणारे **गगनचुंबी हॉटेल बांधण्याचा प्रस्ताव** शहर पालिकेपुढे ठेवला. परंतु पालिकेने विचारमंथन करून व शहर जनतेला विश्वासात घेऊन, हे **तीन मजली जुने हॉटेल न पाडता ते दुसऱ्या ठिकाणी आहे तसे हलवण्याचा अभूतपूर्व असा निर्णय** घेतला.

५} सदरचा निर्णय घेण्यास जेवढा सोपा होता, त्याची अंमलबजावणी करण्यात तो तेवढाच अवघड होता.

तीन मजली जुने हॉटेल हलविण्याच्या हे काम येथील **ईम्मर्ट इंटरनॅशनल** या बांधकाम कंपनीला देण्यात आले. हे हॉटेल **सव्वा किलोमीटरवर** पूर्ववत वसविण्याचे ठरविण्यात आले. पण हे अंतर कापण्यासाठी ही इमारत एका पूलावरून घेऊन जाणे गरजेचे होते. इंजिनिअर टिम ने हा पूल

वरील इमारत **वाहून नेण्याएवढा सक्षम** आहे किंवा नाही हे तपासून पुलाला **हिरवा कंदील** दाखविला.

६} **ईम्मर्ट इंटरनॅशनल** कंपनी ने फेअरमाऊंट हॉटेलचा पाया काही फूट खोदून, जसे आपण **एखादे गाठोडे बांधतो** तसे हे तीन मजली हॉटेल **चारही बाजूंनी रबरी व लोखंडी पट्ट्यानी** घट्ट बांधले. त्यानंतर हॉटेलच्या खाली क्रेन्स सरकाविण्यात आल्या. तसेच सव्वा किलोमीटर अंतरावर ते हॉटेल पुन्हा तसेच शाबूत **उभारण्यासाठी पाया** करण्यात आला.

७} अखेर तो दिवस उगवला.. १ एप्रिल १९८५, हॉटेलचा पाया कापण्यात आला. **यू-ट्यूब** वर मी **जेव्हा या** हॉटेल हालविण्याची चित्रफीत पाहिली तेव्हा त्यावेळी म्हणले गेलेले एक वाक्य **अंगावर शहारे आणणारे** असेच होते.. ते म्हणजे **"The Success was measured in INCHES" त्या दिवशी विजय हा इंचा-इंचाने मोजण्यात येत होता.** मित्रहो किती हे साहस.. जेव्हा हॉटेल सरकवत सरकवत त्या नदीवरच्या पूलापाशी आले तेव्हा **शेवटचा कौल** म्हणून पुलाच्या व पुलाच्या पायाच्या मध्ये असलेल्या फटीत एक काचेची बाटली ठेवण्यात आली. आणि असे ठरविण्यात आले की नदीवराचा हा पूल तीन मजली हॉटेल वाहून नेण्यास जरी सक्षम असलातरी जर ही काचेची बाटली फुटली, **तर हॉटेल पुढे न नेता पुन्हा मागे फिरविण्यात येईल.**

८} पण त्यावेळी बांधलेला हा पूल एवढा मजबूत होता, की **बाटली फूटणे तर सोडाच बाटलीला साधा ओरखडा देखिल आला नाही.** सव्वा किलोमीटर प्रवास करुन सदरचे हॉटेल नविन जागेवर, नविन बांधण्यात आलेल्या पाया वर आहे तसे उभारण्यात आले. **आज २०१७ सालातही १९८५ मध्ये** सव्वा किलोमीटर प्रवास केलेले **'हे हॉटेल'** सॅन एंटोनियो मध्ये येणा-या **पर्यटकांसाठी एक आग्रहाची व आनंदाची पर्वणीच ठरत आहे.**

☆☆☆

# २०. सॅन एंटोनियो: हॉटेल हिल्टन पॅलासिओ डेल रिओ

१} **हिल्टन पॅलासिओ डेल रिओ**, हे एक **५२२ खोल्या** असलेले **२१ मजली हॉटेल** आहे, जे टेक्सास मधील **सॅन एंटोनियो** या शहरात **१९६८ मध्ये** बांधण्यात आले होते. विशेष बाब म्हणजे कॉम्प्युटरचा वापर करुन व मॉड्यूलर बिल्डिंग टेक्नॉलॉजीच्या मदतीने एक आपला झेंडा रोवण्यासाठी उचललेले हे एक महत्त्वपूर्ण पाऊल होते.

२} कमीत कमी दिवसात, ५२२ खोल्यांचे व २१ मजली हॉटेल बांधण्याचे **विश्व-रेकॉर्ड** येथील लोकांनी **सन १९६८** मध्येच करुन दाखवले. सदरचे हॉटेल बांधण्याचे काम **एच.बी. झाकरी** या कंपनीला देण्यात आले होते.

३} कंपनीने पारंपारिक पद्धतीने पहिल्या 4 मजल्यांची बांधणी केली. आणि हॉटेलच्या **सर्व अतिथी खोल्या** या सदर ठिकाणाहून **8 मैल अंतरावर मॉड्यूलर म्हणून स्वतंत्र** बांधण्यात आले. या खोल्या मॉड्युलर युनिट्स **प्लंबिंग फिक्चर, लाइटिंग, आर्ट वर्क, फर्निचरिंग्स** आणि **ऍश ट्रे** सह पूर्ण करण्यात आली. सदरच्या खोल्या या डिजिटली सुपर कॉम्प्युटरशी जोडलेल्या असून, त्या **जश्याच्या-तश्या हेलिकॉप्टर**

**द्वारा उचलून** दिशेनुसार बरोबर त्यांच्याच जागी ठेवण्यात आल्या.

४} सर्व खोल्या ४६ **दिवसांमध्ये** ठेवण्यात आल्या होत्या तर **इतर रचना या २०२ दिवसांच्या** रेकॉर्डसमध्ये पूर्ण करण्यात आल्या. एवढे करुन एच.बी. झाकरी या कंपनीचे **प्रमुख झाकरी** आणि त्यांची **पत्नी मॉली** यांनी हॉटेलमधील रूम नं. ५२२ बुक करुन तेथे पहिल्यांदा राहण्याचा मान पटकावला.

५} **मित्रहो..** १९६८ मध्ये ५२२ रूम्स वेगळया ठिकाणी बांधून त्या उचलून एकत्रित करणे असो किंवा १९८५ मध्ये पुरातकालीन फेअरमाऊंट हे तीन मजली हॉटेल सव्वा किलोमीटर वाहून परत जसे च्या तसे वसविणे असो. **या गोष्टी अमेरिकेने केले का? की इंग्लंडने केले?** हे मला या

ठिकाणी **महत्वाचे वाटत नसून** हे **एक 'मनुष्याने' केले ही बाब खरच वाखाणण्याजोगी अशीच** आहे. मनुष्य आपल्या बुद्धीचा वापर **कीती उंची पर्यंत करू** शकतो याचा एक **जिवंत अनुभव** मला या ठिकाणी येवून गेला.

☆☆☆

# २१. सॅन एंटोनियो:नैसर्गिक गुहेतील नैसर्गिक पूल:

**Natural Bridge Caverns** हा टेक्सास राज्यातील **सॅन एंटोनियो** येथील भूगर्भीय स्वरुपाचा भाग आहे. हा एक **आगळा-वेगळा** व **अदभूत** असा परिसर असून या ठिकाणी **चुनखडींच्या नैसर्गिक गुहा** तयार झालेल्या आहेत. या ठिकाणी सतत पाणी ठिबकून **चूनखडीचा एक नयनरम्य देखावा** तयार झाला आहे. गुहेच्या तळापासून छतापर्यंत **चुनखडीचे हजारो बांबू जणू टेकाविलेले** आहेत असा भास होतो. छताच्या बाजूस पाहिल्यास छताला **ऋषीमुनींप्रमाणे पांढरी दाढी फुटल्याचा** आभास होतो. गुहेच्या आतील तापमान नेहमीच जवळपास **२१ डिग्री सेल्सियस** पर्यंत असते आणि आर्द्रता दर स्थिर **९९ टक्के** असतो.

☆☆☆

# २२. पिट्सबर्ग - आइका फर्निचर मॉल:

आज आम्ही **पेनसिल्व्हेनिया** राज्यात **पिट्सबर्ग** शहरातील **आइका ('IKEA')** नावाच्या **फर्निचर मॉलला** भेट दिली.

१} हे असे ठिकाण आहे जिथे आपण आपल्या घरासाठी / कार्यालयासाठी फर्निचर आणि संबंधित वस्तू वाजवी किंमतीत खरेदी करू शकतो. या मॉलमध्ये आपल्याला सर्व प्रकारच्या फर्निचरचे डेमो पहावयाच मिळतात. त्यासाठी त्यांनी नमुना फ्लॅट / ऑफिस तयार केलेले आहेत. त्यामुळे आपण खरेदी करणार असलेले फर्निचर आपल्या घरामध्ये / कार्यालयात कसे दिसेल याचा **प्रत्यक्ष अनुभवच मिळतो.**

२} यापैकी बरेच फर्निचर हे बहुउपयोगी (**MULTIPURPOSE USE)** अशा पद्धतीचे आहे. बहुतांश सर्वच **फर्निचर हे सुट्ट्या भागात** बॉक्समध्ये बांधून ठेवलेले असते. त्यासोबत फर्निचर जोडण्यासाठी आवश्यक स्क्रूड्रायव्हर-पाने, पक्कड-हातोडी असे साहित्याचे कीटही दिलेले असते. इथे **मजूर खूप महाग असल्याने** या वस्तूंचा वापर करून बंद बॉक्समधील फर्निचरचे सुट्टे भाग घरी नेऊन **स्वतःच जोडावे लागतात**. आपण फक्त आपल्या आवडीचे **फर्निचर निवडा,** त्याचा **कोड सांगा** आणि आपली ऑर्डर आपण स्वतः नेऊ शकता किंवा ती आपल्याला घरपोच ही मिळू शकते हे येथील आगळे-वेगळे वैशिष्ट आहे.

☆☆☆

# २३. ऑस्टिन - थिंकरी पार्क

**'THINK'** म्हणजे **विचार करणे** आणि **'THINKERY'** म्हणजे **विचार करावयास लावणारे.** विज्ञानाशिवाय प्रगती नाही, हे पक्के जाणून असलेल्या अमेरिकन लोकांच्या कल्पकतेतून साकार झालेले **THINKERY.** म्हणजे आपल्या भाषेत सांगायचे झाल्यास **'विज्ञान-उद्यान'!** हे उद्यान **ऑस्टिन** येथे उभारण्यात आलेले आहे. मुलांमध्ये लहानपणापासूनच **विज्ञानाची गोडी लागावी** व त्यांच्यात **वैज्ञानिक दृष्टीकोन** तयार व्हावा हा या उद्यानाचा **मूळ उद्देश.** येथे विविध प्रकारची वैज्ञानिक उपकरणे ठेवलेली असून मुले स्वतः ती हाताळू शकतात व आपल्या कल्पनाशक्तीने नवनवीन प्रयोग करू शकतात.

लहान वयातच मुलांना व्यवहारज्ञान प्राप्त व्हावे या हेतूने येथे **एक छोटा बाजारही** उभारण्यात आला आहे. आपल्याकडील इंग्रजी शाळेतून साजऱ्या होणाऱ्या **'बझार-डे'** प्रमाणेच.. फक्त या ठिकाणी खरेदी करायच्या व विकायच्या वस्तू एकाच ठिकाणी मिळतात. अमेरिकन लोकांची मुलांमध्ये बालपणापासूनच **जिज्ञासूवृत्ती जोपासण्याची** प्रवृत्ती **कौतुकास्पद** अशीच आहे. आपल्या देशातही अशी उद्याने जोगोजाग उभा केल्यास त्याचा आपल्या देशाला नक्कीच फायदा होईल.

☆☆☆

# २४. पाहुणचार कसा करावा?

१} मागच्या वर्षांपर्यंत अमेरिकेस येणे हे **एका पहाटे पडलेल्या स्वप्नापेक्षा अधिक काहीही नव्हते** असे मी म्हणेन. चालू वर्षांत हे स्वप्न पूर्णत्वास नेले ते म्हणजे माझे **साडू तरुण** आणि **मेहुणी सौ. सुचिता सोनी** या दोघांनी. दोघांच्या आग्रहाखातर आम्ही सर्वांनी आमचे **पासपोर्ट** व अमेरिका भेटीसाठी लागणारे **व्हिसा** बनवून घेतले.

२} **अमेरिकेत एक महीना राहायचे, वेगवेगळया ठिकाणी भेटी द्यायचे हे सर्व एवढे सोपे नव्हते.** पण त्यांनी कोणकोणत्या ठिकाणी भेटी द्यायच्या, कोणत्या ठिकाणी किती वेळ द्यावा, लहान मुलांना कोणती ठिकाणे आवडतील, कोणत्या ठिकाणी भारतीय खायला मिळेल, जिथे भारतीय खायला मिळणार नाही तिथे कोणती काळजी घ्यावी.. **अश्या लहानमोठ्या सर्व बाबींचा अगदी सखोल अभ्यास, या दोघांनी आम्ही येण्याअगोदरच करून ठेवला होता.**

३} भारतात आपण आपल्याकडे **कितीही जवळचा पाहुणा आल्यावर** त्याचा पाहुणचार आपण पहिला आठवडाभर अतिशय सुंदर रित्या करू पण त्यानंतर, आपला हुरूप नक्कीच कमी होऊन जातो.. आणि महिनाभर जर तो पाहुणा आपल्याकडेच तळ ठोकून राहणार असल्यास, तो आपल्याला **डोईजड झाल्याशिवाय** राहणार नाही.. **असे माझे वैयक्तिक व प्रामाणिक मत आहे.**

४} **पाहुणचार कसा करावा?** ही गोष्ट खऱ्या अर्थाने **तरुण** आणि **सौ. सुचिता** यांच्याकडे अमेरिकेत आल्यावर मला समजले. **कारण अमेरिकेत प्रवेश केल्यावर आम्हाला घ्यायला आल्यापासून.. ते भारताकडे प्रस्थान करेपर्यंत त्यांच्या या पाहुणचारात "तिळमात्रही फरक पडला नव्हता"..** आणि **ही खरंच माझ्यासाठी अवाक् करणारी अशीच बाब होती.**

५} आमचे **राम-लखन** म्हणजेच माझी दोन मुलं **कर्तव्य** आणि **कुशल**, उघडपणे सांगायचे झाल्यास **थोडे वांड्च आहेत.** तुम्ही असे हसू नका, सर्वांचीच मुलं थोड्याफार फरकाने तशीच असतात.. फरक एवढाच की आमचे हे सुपुत्र फक्त **दोन काकणभर जास्त..** म्हणजेच **चकली सारखे एकदम सरळ.**

६} माझ्या आईवडिलांना आमच्यापेक्षा, आम्ही त्यांच्या दोन नातवंडांची काळजी कशी घेणार? याचीच काळजी लागून राहिली होती. आम्हा दोघांच्या समोर हाच गहन प्रश्न होता की, आम्ही दोघं या दोघांना महिनाभर सांभाळणार तरी कसे?.. **पण तरुण आणि सौ. सुचिता ने त्यांना आमच्यापेक्षा ही जास्त अलगदपणे सांभाळले. त्या दोघांनी या दोघांवर फक्त मायेची पाखरच घातली नाही, तर त्यांना गेल्या महिनाभरात अनेक चांगली वळणे ही लावली.**

७} **मी आजवर आपल्याला अमेरिकेची जी माहिती, जे लेख पाठवले, त्याचेही श्रेय माझ्यापेक्षा जास्त या दोघांनाच जात.** कारण त्यांच्याच उत्कृष्ट नियोजनामुळे, आम्ही ही सारी ठिकाणे बघू शकलो.. आणि **त्यांनी आमचे राम-लखन पूर्ण प्रवासात सांभाळले,** त्यामुळेच मी भेट दिलेल्या ठिकाणांवर थोडेफार लिहू शकलो.

८} **सुचिता** या शब्दाचा अर्थ **सुंदर** असा होतो तर, **तरुण** या शब्दाचा अर्थ **फक्त वयाने तरुण न होता.. आयुष्यात येणाऱ्या सर्व बऱ्या-वाईट प्रसंगातून तरून जाणे असा होतो.** आपल्या नावाप्रमाणेच या दोघांनी ही आमचा अमेरिकेतील हा प्रवास सदैव लक्षात राहील असा सुंदर बनविला व महिन्याभरात आम्हाला कोणत्याही प्रकारची अडचण येऊ दिली नाही किंवा त्याही पुढे जाऊन मी म्हणेन की कोणत्याही परिस्थितीत आलेली अडचण आम्हाला भासू दिली नाही. **इतक्या लहान वयात या दोघांमध्ये आलेली चिकित्सकबुध्दी, व्यवहारचातुर्य, कणखरपणा, आणि समंजसपणा वाखाणण्याजोगा असाच आहे.** इतक्या कमी वेळेत यांनी अमेरिकेतील वातावरणाशी, रहाणीमानाशी इतक्या चांगल्या प्रकारे जुळवून घेणे ही खरच खूप अवघड बाब

आहे, जी या दोघांनी अतिशय सुरेख रित्या दाखवून दिली आहे, **ते पाहून मला या दोघांच्या पाठीवर शाब्बासकीची थाप दिल्या शिवाय राहवले नाही.**

९} **हे दोघेही जरी माझ्यापेक्षा चार-पाच वर्षे लहान असले तरी गेल्या एक महिन्यात मी या दोघांकडून अनेक गोष्टी शिकलो.** जसे अमेरिकेच्या मोठमोठ्या रस्त्यावर काळजीपूर्वक गाडी कशी चालवावी, गाडी चालवताना गुगल मॅपचा जास्तीतजास्त चांगल्याप्रकारे वापर कसा करावा, वाहतुकीच्या नियमांचे काटेकोरपणे पालन कसे करावे, आपल्या हातून कमीतकमी कचरा करून निसर्गाची मदत कशी करता येईल.. **आणि त्याहूनही अधिक महत्त्वाचे म्हणजे घरी आलेल्या पाहुण्यांच्या पाहुणचार कसा करावा.. "श्रीविठ्ठलाची कृपादृष्टी" या दोघांवर 'सदैव' राहावी, त्यांचे एकमेकांवरील प्रेम वर्षानुवर्षे वृद्धिंगत होवो, हीच प्रार्थना.**

१०} **अमेरिकेतील महिन्याभराच्या प्रवासाचा आज शेवटचा दिवस आहे.** भारताकडे परतत असताना अंतःकरण थोडे जड होत आहे. **दुःख** आणि **आनंद** अशा संमिश्र भावना मनात उचंबळून येत आहेत. दुःख या गोष्टीचे की अमेरिकेत गेल्या महिन्याभरापासून जोडल्या गेलेल्या नात्याची आज सांगता होत होती. तरीही आनंद या गोष्टीचा की, आज आपण मायदेशी परतत आहोत व परतत असताना येथून अनुभवाचा आणि कधीही न संपणारा असा आठवणींचा खजिना आपण घेऊन जात आहोत. **आणि जाणे गरजेचे ही आहे कारण भारतात येऊन जीएसटी चे लगीन ही लावायचे आहे;)**

**आपणा सर्वांच्या माहितीसाठी आमच्या सर्वांचा एक फोटो जोडत आहे..**



(फोटोत डावीकडून उजवीकडे तरुण, सौ. सुचिता, कुशल, कर्तव्य, सौ. स्मिता आणि मी)

☆☆☆

## २५. अमेरिकेतून भारतात आल्यावर मिळालेले सुखद धक्के..

१} अमेरिकेतील एक महिना अद्भुत असा अनुभव घेतल्यावर भारतात आल्यावर मिळालेले सुखद धक्के विश्वास न बसणारे असेच होते.. त्यातील **पहिला धक्का** म्हणजे **आम्हा चौघांना मुंबई विमानतळावर पंढरपूर ते मुंबई असा ३६० किलोमीटरचा प्रवास करून वडिलांबरोबर आलेली ८३ वर्षांची आमची आज्जी.** चातक पक्षी जसं पावसाची वाट बघतो अगदी तसच महिनाभरापासून आपल्या नातू व पणतूंची आतुरतेने वाट पाहणाऱ्या **या आज्जीत, या वयात, एवढे अंतर कापण्याचे बळ कोठून मिळाले हे देवच जाणे?**

२} पंढरपुरात घरी पाऊल ठेवता न ठेवता **सडा-रांगोळीने सजवलेले आंगण** हे आमच्या स्वागतार्ह सकाळपासून उभे होते. जागोजागी लावलेले फुलांचे बूके आमचे स्वागत करीत होते. **प्रेमाचा वर्षाव करणारी पुष्पवृष्टी ही मन चिंब करणारी अशीच होती.**

३} **सनईच्या सुमधूर अश्या वातावरणात आमच्या मातोश्रींनी आमचे औक्षण केले.** यावेळी आम्हा चौघांना सुंदर अश्या भेटवस्तूंचा आहेरही करण्यात आला. **वडिलांच्या खास मित्रांनी देखील सुंदर अश्या पुष्पगुच्छांसह या स्वागत सोहळयास आपली अमूल्य उपस्थिती लावली होती.**

४} ऑफिसमधल्या **माझ्या जीवलग अशा लहानमोठ्या बहीण-भावंडांनी** पेढे भरवून, आम्हाला अत्यंत सुंदर अशी **श्री विठ्ठलाची मुर्ती** भेट म्हणून दिली.

५} त्यानंतर **आईने महिनाभरापासून दूर असलेल्या आपल्या या पिल्लांसाठी बनवलेल्या शाही मेजवानीचा..** म्हणजेच श्रीखंड-पूरी, मिरची-भजी, जीरा-राईस आणि दाल-तड़का अश्या लज्जतदार भोजनाचा **स्वर्गानंद घेतला.**

६} दहा वर्षांपूर्वी जेव्हा माझे लग्न झाले होते तेव्हाही **माझे आणि स्मिताचे** असेच स्वागत झाल्याचे मला एकदम आठवले. **आज दहा वर्षांनंतर पुन्हा पहिल्याच बायको बरोबर दूसरे लग्न केले की काय? असा भास होत होता;)**

**हे सगळे क्षण कधीच संपू नये.. असे वाटत असताना, परत पुढील वर्षीच्या दुस-या परदेश दौऱ्यासाठी आत्तापासूनच तयारी करावी का काय? हा विचार मनात चमकून गेला..**

☆☆☆

## २६. राष्ट्रप्रेम कसे असावे?

**जगातील सर्वात बलाढ्य देश कोणता?** असे आपल्याला विचारल्यास **अमेरिका** सोडून अन्य कोणत्याही देशाचे नाव स्वप्नातही येणार नाही असे माझे प्रामाणिक मत आहे. आतापर्यंत लिहिलेल्या लेखातून अमेरिकेतील अनेक स्थळांचे दर्शन आपल्याला घडविण्याचा छोटासा प्रयत्न मी केला. परंतु सर्वात महत्वाचे म्हणजे मला अमेरिकेत दिसून आलेले अमेरिकन लोकांचे **आपल्या राष्ट्राबद्दलचे उत्कट प्रेम, भक्ती आणि आदर.**

आज हे पुस्तक लिहिण्याचे एकमेव कारण **अमेरिकेचे गुणगान गाणे नसून,** अमेरिका आज ज्या उंचीवर आहे त्यामागचे **महत्वाचे गुपित** जर काही असेल तर, ते म्हणजे तेथील नागरिकांची आपल्या देशाबद्दलची **'मनापासून असणारी प्रगतीची खरी तळमळ'** होय.

आज मला सांगावयास **खरच खेद वाटतो की,** आज आपल्या देशांत **'देशप्रेम'** हे फक्त **सोशल मीडियावरच** शिल्लक राहिले आहे. किंवा **१५ ऑगस्ट** आणि **२६ जानेवारी** या दोन दिवसांपूरतेच मर्यादित राहिले आहे असं मला वाटतं. आणि त्यामुळेच स्वातंत्र्याला ७२ वर्षे लोटूनही, आपल्या **देशाच्या पंतप्रधानांना** आजही आपल्याला **स्वच्छतेचे, भ्रष्टाचारमुक्तीचे, शिक्षणप्रसाराचे, नियमांचे पालन करण्याचे धडे देण्याची गरज पडत आहे.**

आज भारतातील सत्यस्थितीचे जर आपण अवलोकन केले तर, आपण प्रगतीच्या दिशेने वाटचाल करीत आहोत? की अधोगतीच्या दिशेने? हा प्रश्नावर वर आपण प्रत्येकाने **अंतर्मुख होऊन विचार करणे गरजेचे आहे.** आज वाचकांना मला या पुस्तकातून आवर्जून सांगावेसे वाटते की, जर आपण भविष्यात आपल्या **'भारताचा देखील अमेरिका करण्याचे'** स्वप्न मनात बाळगन असू, तर आपणां प्रत्येकाला **'एक सुजाण आणि सुज्ञ नागरिक'** बनणे ही आज काळाची गरज झाली आहे.

मित्रांनो.. देशभक्तीसाठी आपल्याला **कोणत्याही सीमेवर जाऊन लढण्याची गरज नाही.** तर आपल्या हातातील काम जरी आपण चोख पद्धतीने व प्रामाणिकपणे करण्याचा १००% प्रयत्न केला तरी, तो देखील एका प्रकारे आपल्या **'देशाची सेवा करण्याजोगाच आहे'**. देशातील नैसर्गिक

साधनसंपत्ती धोक्यात येईल असे कोणतेही काम करण्यापूर्वी आपण कमीतकमी **एकवेळतरी विचार करणं** फार फार गरजेचं आहे.

देशातील प्रत्येक नागरिक हा **'आपल्या भारतीय परिवाराचा एक सदस्यच आहे'** ही **तीव्र इच्छाशक्ती** प्रत्येक व्यक्तीने स्वत:च्या मनात रुजवली पाहिजे. **'देशभक्ती'** ही फक्त काही क्षणांपुरती, तासांपुरती किंवा दिवसांपुरती मर्यादित न राहता ती आपल्या **'पहिल्या श्वासापासून आपल्या शेवटच्या श्वासापर्यंत'** जतन करण्याची, खरी गरज आहे. कोणतीही क्रांती एका दिवसात घडत नाही असा इतिहास आहे. बदलाची सुरुवात स्वतः पासून करा. एक दिवस नक्कीच आपणही अमेरिकेसारखे प्रगत राष्ट्र होवून जावू.

या पुस्तकांतर्गत ही **देशभक्तीची भावना** सर्व वाचकांच्या मनात सदैव तेवत राहो, **परमेश्वर** सर्वांना **विवेकबुद्धी** देवो असे मागणे मागत.. इथेच थांबतो.. **धन्यवाद !**

☆☆☆

**२७. अभिप्राय:**

मी अमेरिकेत असताना तिथे पाहिलेल्या प्रत्येक स्थळाचे फोटो व त्यांची सविस्तर माहिती व्हाट्सअप वर अनेकांना पाठवित होतो. ते पाहून अनेकांनी आपले अभिप्राय मला पाठविले. माझा अनुभव पुस्तक रुपात प्रसिद्ध/प्रकाशित करावा असे काही निवडक अभिप्राय येथे देत आहे. **या सर्वांचा मी ऋणी आहे.**

**ह.भ.प. श्री वा. ना. उत्पात महाराज (पंढरपूर):**

'माझी अमेरिका भ्रमंती' हे श्री पवनकुमार झंवर यांचे पुस्तक म्हणजे **अमेरिकेचा प्रवास करणाऱ्यांसाठी समग्र माहितीची मार्गदर्शिकाच** आहे. अमेरिकेतील वाहतूक व्यवस्था, राहणीमान यांचे विशेष वर्णन केले आहे. पाहुणचार कसा असावा? या प्रकारातील कौटुंबिक जिव्हाळा मनाला स्पर्शून गेला. या विषयीचे लेखकाचे चिंतन भावस्पर्शी आहे. **मायदेशी परत आल्यावर घरी त्यांचे जे स्वागत झाले, त्याचे वर्णन एखाद्या साहित्यिकाने करावे हृदयस्पर्शी आहे.** तो समारंभ पाहून लेखकाला पहिल्याच बायकोबरोबर दुसरे लग्न केल्याचा भास झाला. हा अनुभव खरंच हृदयस्पर्शी आहे. हे पुस्तक वाचताना आपण अमेरिकेची सहल करीत आहोत, असे वाटले. सदैव

अर्थव्यवहारात गढून गेलेल्या पवनकुमारांनी अमेरिकेचे घडविलेले हे रमणीय दर्शन त्यांच्या रसिकपणाचे द्योतक आहे. यानंतर त्यांनी जगाचे पर्यटन करावे, हीच सदिच्छा व्यक्त करतो.

**श्री बाळासाहेब बडवे (संस्थापक संपादक, दैनिक पंढरी संचार पंढरपूर):**

अनुभव समृद्ध जीवन जगणे याला जीवनात एक परिमाण असते. **देशाटन केल्याने अनुभवाची शिदोरी आपल्याला मिळते**, त्याला भौतिक ज्ञानाचा साज म्हणण्यापेक्षा आंतरिक ज्ञानसाधना म्हणणे उचित ठरेल. अर्थशास्त्रात रमणाऱ्या श्री झंवर यांनी नुसती अमेरिका भ्रमंती करून **आपल्या पुरती मर्यादित न ठेवता, उघड्या डोळ्यांनी अनुभवलेली अमेरिका सर्वांसमोर ठेवली**, याबद्दल त्यांचे अभिष्टचिंतन. विविध देशांची भटकंती पुढे करावी एवढी समृद्धी त्यांना प्राप्त होवो, हीच श्री रुक्मिणी-पांडुरंग चरणी प्रार्थना.

**सौ. इंदिराजी मर्दा (रेडीमेड व्यापारी, पंढरपूर):**

चि. पवन चे 'माझी अमेरिका भ्रमंती' हे अमेरिका प्रवासाचे **उत्तम** लेख वाचले. आज पर्यंत अमेरिकेवर खूप पुस्तके वाचली, परंतु पवन ने जी **प्राथमिक माहिती दिली** ती मी आज पर्यंत कुठल्याही पुस्तकात वाचली नाही. कारण अमेरिकेला जायचं तर सुरुवात कुठून करायची? कुणाला विचारायच? काही कळत नाही. पण या पुस्तकामुळे प्राथमिक व अमेरिकेबद्दलची माहिती **उत्तमरीत्या** कळली. **आता मी पण अमेरिकेला जायच धाडस करू शकते.**

'श्री विठ्ठलचरणी' हीच प्रार्थना की पवन अशीच भ्रमंती करत राहो व आम्हाला आपल्या लेखानाद्वारे देश-विदेश चा प्रवास घडवित राहो.. **आशीर्वादासह..**

## श्री नंदकिशोरजी गो. मर्दा (व्यापारी, पंढरपूर):

श्री पवनकुमार झंवर यांनी **'माझी अमेरिका भ्रमंती'** या विषयावर स्वानुभवाने तयार केलेले छोटे पुस्तक मी वाचले. या ३६ वर्षीय तरुणाचे **कौतुक** वाटले. पवनकुमारने सीएचा व्यवसायाचा व्याप सांभाळून १ महिन्याची सवड अमेरिका वारीसाठी काढली. या धकाधकीच्या काळात सध्या कुणालाही सवड सापडत नाही. हे सत्य चित्र डोळयासमोर असताना एक सीए तरुण सपरिवार १ महिन्याची सुट्टी घेऊन अमेरिका वारी करतो, **हा आदर्श तरुण पिढीने घेण्यासारखा आहे.**

**'केल्याने होत आहे रे, आधी केलेची पाहीजे'** या न्यायाने त्याने यापुढे अमेरिका वारी करणाऱ्याला, परदेशी जाताना घ्यायची काळजी, पासपोर्ट, व्हिसा, तेथील राहणीमान व अनेक स्थळांची इत्यंभूत बारीक-सारीक माहिती त्याने या घोट्या पुस्तकातून अतिशय सुंदर व समजावयास सोप्या अशा भाषेत वर्णीली आहे. हे संकलन अमेरिका जाणाऱ्यास माहितीसाठी **मैलाचा दगड** ठरणार आहे.

**पवन म्हणजे वारा,** पवनचे काम नावाप्रमाणेच वाऱ्यासारखे, एकदा अंगीकारलेले कार्य झपाटून करत राहणे हा त्याचा स्थायीभाव आहे. याचा अनुभव मला आला आहे. पवनने आमचे **राजस्थानी समाजाचे अध्यक्षपदी** असताना अनेक उपक्रम राबवले व **'राजस्थानी मंडळ समाज सूची, २०१५'** काढून समाजाची सेवा केली.

**'शुद्ध बीजापोटी - फळे रसाळ गोमटी'**, या म्हणीप्रमाणे **स्व. बेगराजजी** व **श्री विजयकुमारजीच्या घराण्यातील** या युवकाने आपले नाव, **आमचे समाजातच नव्हे, तर सर्वच समाजात कमावले आहे.**

माझे वय **७० वर्षाचे** झाले असून, यापुढे मी कांही अमेरिका वारीला जावू शकणार नाही. परंतु हे पुस्तक वाचले, व **मी अमेरिका वारीचा अनुभव करू लागलो,** एवढी बारीक माहिती त्याने या पुस्तकात दिली आहे.

मला पवनच्या या उपक्रमाबद्दल **श्री संत तुकाराम महाराजांचा एक अभंग** आठवतो तो असा आहे –

**आपुलिया हिता जो असे जागता । धन्य माता पिता तयाचिया ॥१॥**
**कुळी कन्यापुत्र होती जी सात्विक । तयाचा हरीख वाटे देवा ॥धृ॥**
**गीता भागवत करिती श्रवण । अखंड चिंतन विठोबाचे ॥२॥**
**तुका म्हणे मज घडो त्याची सेवा । तरी माझ्या दैवा पार नाही ॥**

या अभंगाचा अर्थ पवनशी एकदम जुळत आहे, आपले कुळातील हितांशी जागृत राहून, जो आपले सत्कार्य करीत राहतो. ज्या कुळातील कन्या-पुत्र, जे सात्विक असतात **त्याचा अभिमान देवालाही वाटतो.** शेवटी श्री तुकाराम महाराज म्हणतात **अशा माणसाची सेवा करण्याचे मला भाग्य लाभले तर माझे दैवाला पारावार राहणार नाही.**

आज लिहिण्यासारखे खूप आहे, पण विस्तारभय लक्षात घेता येथेच थांबतो. पुनश्य पवनला **अखंड आशीर्वाद देवून,** त्याचे समाजकार्य असेच वाढत राहो व या सत्कार्यासाठी त्याला उदंड आयुरारोग्य श्री पांडुरंगाने द्यावे ही **प्रभूचरणी प्रार्थना करतो.**

**'विद्वान सर्वत्र पुज्यते'** या न्यायाने त्याला असेच मान-सन्मान मिळत राहोत हीच प्रार्थना..

**श्री चंदुलाल सुपेकर (कापड व तेल व्यापारी, पंढरपूर):**
'माझी अमेरिका भ्रमंती' हा पवन झंवर यांनी लिहिलेला लेखसंग्रह वाचण्यात आला. प्रथमदर्शनी प्रत्येक लेखाचे महत्व, मांडणी आणि रचना पाहतानाच **लेखाच्या भव्यतेची** जाणीव झाली. पुस्तकाच्या सुरुवातीला दिलेली **अनुक्रमाणिका पाहूनच** यातील विषय किती काळजीपूर्वक मांडण्यात आले असतील याची कल्पना आली.

**पासपोर्ट** आणि **व्हिसा काढण्याचे बारकावे** खुप सुंदर पद्धतीने मांडले आहेत. नंतरचे लेख वाचताना अमेरिकेत गेल्यापासून भारतात परत येईपर्यंत व भारतात घरी पोहचेपर्यंतचे वर्णन **खूप प्रशंसनीय** आहे. वाचताना असे वाटत होते की, कुणीतरी जाणकार लेखक याचे वर्णन करीत आहे. **क्षणभर** मला या लेखात तुमच्यातील **'CA' पेक्षा 'लेखक' खूप मोठा वाटला.** आपण इतके **मुरब्बी** असाल याची कल्पना प्रथमच आली.

प्रत्येक ठिकाणच्या वास्तवतेचे वर्णन इतके **इत्यंभूत** केले गेले आहे की आपण जरी प्रत्यक्ष गेलो तरी, इतके **बारकावे नजरेत भरणे** आपल्याला अशक्य असते. त्यामुळे **Live वर्णन चालू असल्याचा** मला भास झाला. त्यामुळे पवनचे मानावे तेवढे धन्यवाद कमीच आहेत.

आपले वर्णन वाचून इतर जाणकारांनाही परदेश कसा पहावा? काय काय गोष्टींची नोंद घ्यावी? नजर कशी असावी? याचे मार्गदर्शन नक्कीच होईल व आम्हीही **भविष्यात अश्या पद्धतीचा आनंद घेऊ व देऊ.** पुन्हा एकदा धन्यवाद व आपणाला सहकार्य करणारे पाहुणे, मित्र, यांचे देखील आभार. जयहिंद, जय महाराष्ट्र.

**श्री विष्णुकांतजी झंवर (रिटायर्ड इंजिनीअर, नांदेड):**

Pavanji, your USA tour info with photos is **really amazing & admirable.**

I feel that I am at that particular spot. Now I want you to save all text and photos since begining. On returning I want those from you. I am sure I will enjoy USA tour when I go there. If, by chance I couldn't go, **I will not be sorry with your this treasure.**

**श्री ऋषिकेशजी गिल्डा (मेडिकल डीलर, अंबड):**

अप्रतिम आहे सगळ काही.. पण त्या सगळया गोष्टीत मात्र एक नक्की छान आहे, ते म्हणजे तुम्ही केलेली अमेरिकेच्या प्रत्येक जागेची **विस्तृत माहिती..**

अगदी अस वाटत आहे की आम्ही पण त्या सगळया गोष्टी स्वतः पाहिल्या की काय? खर म्हणजे हे सगळ मनापासून लिहिणे **सगळयाना ज़मण शक्यच नाही..** ते फ़क्त जमणार.. पवन झंवर यांनाच.. धन्यवाद!!

**श्री महेशजी भट्टड (कापड व्यापारी, बनहट्टी):**

Very nicely written Bhaiya, Marathi was too tough on me so had to translate, but it was worth reading. Have to say Bhaiya, U are really good at **living a meaningful life..** lot to learn from you and **proud of You.**

**श्री सदानंद कदम (ऑटोमोबाईल व्यावसायिक, पंढरपूर):**

अतिशय सुंदर, आपण अमेरिकेत आहात आणि खरोखरच मी **आपणा सोबतच आहे की काय?** असा भास होत आहे. आपण देत असलेल्या अमूल्य माहितीमुळे **आमचे कुटुंब भारावून गेले आहे.** काय सांगावे या नंतरची आमची ट्रिप कदाचित अमेरिकेचीच असू शकेल. अनेक अनेक धन्यवाद.

**श्री मिलिंद तानवडे (कर-सल्लागार, पंढरपूर)**

ध्येयाने झपाटलेल्या, मनाने, विचाराने व शरीराने तरुण असलेल्या, जीएसटीची प्रचंड धावपळ असतानाही, खास आपल्या लोकांना अमेरिका कळावी म्हणून व **'शहाणे करुनी सोडावे सकळ जन'** या हेतूने अथक परिश्रमातून पवन झंवर यांनी लिहिलेले 'प्रवास-वर्णन' नक्कीच दिशादर्शक व मार्गदर्शक आहे. म्हणतात देश पहिल्याने ज्ञान समृद्ध होते, याही पुढे अशाच अनेक अभ्यासपूर्ण पर्यटनाचा योग झंवर दाम्पत्यास लाभो हीच श्री गजाननाचरणी विनम्र प्रार्थना.

**श्री अजित सावळे (रेडीमेड व्यापारी, पंढरपूर):**

श्री पवनकुमार झंवर यांनी लिहिलेले 'माझी अमेरिका भ्रमंती' हे नुसते प्रवास-वर्णन नसून अभ्यासपूर्वक व सर्वांना **उपयुक्त** असे लिखाण आहे. कोणत्याही विषयाचा **सखोल अभ्यास** करून तो **सोप्या पद्धतीने** सर्वांना समजेल असा मांडणे हि त्यांची हातोटी आहे. सदर लेख वाचल्यावर खरोखरीच अमेरीकेला जावेसे वाटते. असेच त्यांनी **जगभ्रमण** करून सर्वांना प्रेराणादायी ठरेल असे लिखाण करावे.

**सीए सौ. राजलक्ष्मी शिबे (कर-सल्लागार, कोल्हापूर):**

It is always a good idea to put your experience in words and when it is related to **amazing places** it becomes even more interesting and informative for the readers. The way you have **narrated your experiences** which you had during

your visit to different places in USA, **is worth reading.** Not only because it is informative but it gives you a feeling of **actually virtually experiencing** those places while reading. In fact I relived some of my memories while reading about **Statue of Liberty** and **Niagara.** Also the pictures in the write ups make it more attractive.

**The compilation of write ups in a complete book is a good idea and will serve as a guide for the wanna be visitors.** I used to be **waiting for the write ups** everyday and I am sure other friends have felt the same. This book is an answer to all the What, When, How, Where type questions of a person willing to go on a holiday to USA. Lastly your unique style of **expressing the experience** and **viewpoints** makes this book **worth reading.** Wish you all the best and looking forward for the final copy soon :)

☆☆☆

## ‘परदेशवारीसाठी मनगटी बळ भरण्याचा एक छोटासा प्रयत्न’

मित्रहो..

‘परदेशी जाणे’ म्हणजे म्हणजे **फार अवघड काम** असते, असा बऱ्याचवेळी लोकांचा गैरसमज असतो. हा गैरसमज कमी करून, वाचकांच्या ‘मनगटी परदेशवारीसाठीचे बळ भरण्याचा एक छोटासा प्रयत्न’ मी **‘माझी अमेरिका भ्रमंती’** या माझ्या पहिल्या पुस्तकातून करीत आहे.

परदेशवारीतील **अनुभव, प्रसंग, क्षणचित्रे** आपल्यासाठी संकलित करून या पुस्तकाच्या माध्यमातून **आपल्या भेटीसाठी देत आहे.** ‘अमेरिका’ हा फक्त **फिरण्याचा** किंवा नुसती **भटकंती** करण्याचा देश नसून आपल्या **ज्ञानात भर घालणारा देश** आहे.

या ठिकाणी मी नक्कीच म्हणेन की, अमेरिका हा **‘बघण्याचा नसून शिकण्याचा देश’** आहे. माझा हा छोटासा प्रयत्न आपणास **नक्की आवडेल** ही खात्री..

**सीए पवनकुमार विजयकुमार झंवर**

**पत्ता:** ‘शिवकृपा’, जैन मंदिर समोर,

महावीर नगर, पंढरपूर - ४१३३०४

**मोबाईल:** ८८०-५२०-७७७७

**ईमेल:** pzanvar@gmail.com

मित्रहो

पुस्तकं वाचून कोणी शहाणं होतं का?

हो! आम्ही म्हणतो होतं. वाचन करणारी माणसं त्यांच्याबरोबरच्या वाचन न करणाऱ्या माणसांहून अधिक प्रगल्भ आणि विचारी असतात.

कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. इतर प्राण्यांना काही प्रमाणात त्यांचे जन्मदाते थोडंफ़ार शिक्षण देतात. पण मानव हा असा प्राणी आहे ज्याला पुर्वी जगलेल्या आणि आता जिवंत नसलेल्या माणसांचे अनुभवही शिकता येतात . ते पुस्तकांद्वारे. माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे. प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात. म्हणून वाचा. वाचत रहा. इतरांना वाचायचा आग्रह करा. वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे.

मंडळी!

वाचायला तर हवंच!

पण वाचून झाल्यावर प्रतिसादायलाही हवं...

...आणि स्वतःही लिहायला हवं.

esahity@gmail.com

www.esahity.com